# देवपूजा अशी करा

वि. के. फडके

देवपूजा शंका समाधान

देवपूजा कशासाठी?

मूर्ती कशी असावी?

देवपूजेचे शास्त्रशुद्ध नियम






देवपूजेची शास्त्रशुद्ध माहिती

# देवपूजा अशी करा

वि. के. फडके

अक्षय्य प्रकाशन, पुणे २.

देवपूजा अशी करा / वि. के. फडके



♦

प्रकाशक

संजय भ. साळवी

अक्षय्य प्रकाशन

१९० शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.

मो. : ९७६७१७६६५५, ९४२२५१०१७५

♦



♦

प्रथमावृत्ती : दीपावली, १-११-१९९७

नवीन आवृत्ती : गुढी पाडवा, २०१४

♦

अक्षरजुळणी

का. वि. शिगवण

'अक्षरवेल'

सी १८, प्लॉट नं ५७२, सर्व्हे नं. १२९,

दत्तवाडी, पुणे ३०.

♦

मुद्रक

श्री आर्ट प्रिंटर्स

३१६, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२



# देवपूजा कशासाठी ?



बहुतेक सर्वच धर्मियांच्या घरातून रोज देवपूजा केली जाते. बहुतेक म्हणण्याचे कारण काही घरे प्रस्तुत लेखकाने अशीही पाहिली आहेत की, तेथे देव असूनही रोज देवपूजा मात्र केली जात नाही ! प्रस्तुतचे पुस्तक अशा लोकांसाठी नसून ज्यांच्या घरी रोज नियमाने देवपूजा केली जाते अशांसाठी आहे.

अर्थात्, ही पूजा नुसती रोज करूनही उपयोग नाही तर ती शास्त्रशुद्ध पद्धतीने व ‘ मनापासून ’ केली पाहिजे. कसेतरी देवावर पाणी ओतून त्याच्या कपाळी गंधाचा टिळा लावून आरती केली की देवपूजा संपली, आता देवाचे कर्तव्य म्हणजे कृपा करणे हे त्याने त्वरित पार पाडावे, अशी अपेक्षा

करणाऱ्यांना देवपूजेचे फल कधीही प्राप्त होणार नाही. थोडक्यात म्हणजे देवपूजा हा कसातरी 'उरकून टाकण्याचा' विधी नाही. एकवेळ शास्त्रात सांगितलेले सर्व उपचार न केले तरी चालतील. परंतु ती अंत:करणापासून, प्रेमाने व कर्तव्यबुद्धीने केली पाहिजे. 'भाव तेथे देव' ही संतोक्ती आपण सदैव लक्षात ठेवली पाहिजे व आपली देवपूजा मनोभावे केली पाहिजे.

देवपूजा ही केवळ मूर्तीपूजाही नाही. मूर्ती हे केवळ माध्यम आहे. त्या मूर्तीच्याही पलीकडे विश्वावर नियंत्रण ठेवणारी जी सर्वव्यापी शक्ती आहे, त्या शक्तीचा शोध त्या मूर्तीच्या माध्यमातून आपल्याला घ्यावयाचा आहे. सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्याचे ते एक माध्यम आहे, साधन आहे.

ही मूर्तीपूजा तन मन ओतून शास्त्रशुद्ध पद्धतीने करीत राहिले तर चराचरात भरून राहिलेल्या त्या सर्वव्यापी शक्तीचा, ईश्वराचा आपल्याला एक दिवस निश्चितच अनुभव आल्याशिवाय राहणार नाही!

अशी ही देवपूजा शास्त्रशुद्ध पद्धतीने कशी करावी, ऋषिमुनींनी याबाबत कोणते नियम घालून दिले आहेत, संतमहंत याबाबत काय सांगतात, या सगळ्याचा विचार करून प्रस्तुतचा छोटासा ग्रंथ वाचकांपुढे ठेवला आहे. वाचक या ग्रंथाचे स्वागत करतील व निष्ठेने, भक्तीने व तन्मयतेने देवपूजा करून ईशकृपेला पात्र ठरतील अशी आशा वाटते.

**वि. के. फडके**
१८०६, सदाशिव पेठ
देशमुख वाडी, पुणे ४११०३०

◆◆◆

# देवपूजा अशी करा



परमेश्वराचे अस्तित्व सर्व धर्मांनी मान्य केले आहे. हे ब्रह्माण्ड आपोआप निर्माण झालेले नाही. तिचा निर्माता व पालनकर्ता कुणीतरी असलाच पाहिजे. परमेश्वर दिसत नाही म्हणून त्याचे अस्तित्व अमान्य करणे चुकीचे ठरेल. तसे पाहिले तर हवा देखील आपल्याला दिसत नाही. परंतु तिचे अस्तित्व मानावेच लागते. अगदी त्याचप्रमाणे परमेश्वराची अतर्क्य लीला पाहिल्यानंतर तो कुठेतरी अस्तित्वात असलाच पाहिजे या गोष्टीवर विश्वास ठेवावाच लागतो. असा हा सर्वशक्तिमान परमेश्वर खरे तर निर्गुण निराकार असा आहे. या जड नेत्रांनी आपण त्याला पाहू शकत नाही आणि म्हणूनच आपण त्याची मूर्ती बनविली आहे. अर्थात, मूर्ती हे त्याचे प्रतीक आहे. गणेश, राम, शिव, देवी अशा प्रतीक स्वरूपात आपण त्याची पूजा करतो.

**ही पूजा सगुणाकडून निर्गुणाकडे जाण्यासाठी आहे.** याबाबत श्रीसमर्थांनी 'सगुणाचेनि आधारे। निर्गुण पाविजे निर्धारे॥ असे एके ठिकाणी स्पष्टपणे सांगितले आहे.

## निर्गुणाला सगुणात आणले.

अशा प्रकारे मनुष्याने 'आपल्या सोयीसाठी' निर्गुण निराकार परमेश्वराला सगुण रूपात आणले. त्याच्या मूर्ती बनविल्या आणि त्रिकालज्ञ ऋषिमुनींनी या सगुण रूपातील ईश्वराची पूजा करण्याचे नियम घालून दिले. या नियमांचे पालन केल्यास भगवंतही सगुण रूपात दर्शन देऊन मानवाच्या मनोकामना पूर्ण करतो. एवढेच नव्हे तर त्याची जन्ममृत्यूच्या फेऱ्यातूनही सुटका करतो. या संदर्भात अनेक संतांचे दाखले आपल्याला देता येतील. अशा या भगवंताला प्रसन्न करण्यासाठी ऋषिमुनींनी त्याच्या मूर्तीची पूजा करण्यास सांगितले. तसेच, या पूजेचे काही नियमही घालून दिले. त्या नियमांचे काटेकोरपणे पालन करून ही देवपूजा केली तर ईश्वरी अस्तित्वाचा व कृपेचा अनुभव आल्याशिवाय राहत नाही.

यासाठीच प्रस्तुत ग्रंथात शास्त्रशुद्ध पद्धतीने देवपूजा कशी करावी याबद्दलची महत्त्वाची माहिती दिली असून वाचकांनी तिचा उपयोग करावा अशी अपेक्षा आहे. या ठिकाणी स्कंद पुराणातील एक वचन वाचकांना मुद्दाम सांगावेसे वाटते. ते वचन असे–

'भक्त्या वा यदि वा ऽ भक्त्या, कलौ मुक्तिमवाप्नुयात'॥ याचा अर्थ या कलियुगात पूजकाची भक्ती असो वा नसो, देवाची पूजा करणाऱ्याला मुक्ती ही मिळतेच.

जन्ममृत्यूचा फेरा संपून ही मुक्ती मिळावी, परमेश्वराची कृपा प्राप्त व्हावी, आत्मानंदाचा लाभ व्हावा, अशासाठी ही देवपूजा आपल्याला जास्तीत जास्त भक्तिभावाने करावयाची आहे. ती शास्त्रशुद्ध पद्धतीने केल्यास तिचे फल

लवकर मिळेल आणि यासाठीच या छोट्याशा पुस्तिकेचा प्रपंच मांडला आहे.

आता देवपूजा सुरू करण्यापूर्वी काही महत्त्वाच्या प्राथमिक गोष्टींची माहिती पाहू.

## मूर्ती कशी असावी ?

आपल्याला ही देवपूजा घरात करावयाची असल्याने घरात ठेवावयाची मूर्ती कशी असावी, ती कोणत्या धातूची असावी, तिची उंची किती असावी या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे. याबाबत जे नियम शास्त्रकारांनी घालून दिले आहेत त्यानुसार आपण याबाबतची माहिती पाहू.

मूर्तींमध्ये प्रमुख तीन प्रकार आहेत. १) योग मूर्ती २) भोग मूर्ती ३) वीरमूर्ती आणि ४) अभिचारक मूर्ती. प्रथम यांची माहिती पाहू.

१) **योग मूर्ती :** ज्ञान व भक्ती यांच्या प्राप्तीसाठी तयार केलेल्या मूर्तीला 'योग मूर्ती' असे नाव आहे.

२) **भोग मूर्ती :** जगातले नाना भोग प्राप्त व्हावेत या इच्छेने तयार केलेल्या मूर्तीला 'भोग मूर्ती' म्हटले जाते.

३) **वीर मूर्ती :** बलप्राप्तीसाठी ज्या मूर्ती तयार केल्या जातात (उदा. हनुमान मूर्ती) त्यांना 'वीर मूर्ती' म्हणतात.

४) **अभिचारक मूर्ती :** जारण मारण इ. वाईट कामासाठी तयार केलेल्या मूर्तीला 'अभिचारक मूर्ती' असे नाव आहे.

## उंची किती असावी ?

देवघरातील मूर्तीची उंची किती असावी यासाठीही दंडक घातलेले आहेत. ही मूर्ती जास्तीत जास्त 'एक वीत' एवढीच उंचीची असावी.

काही घरात दोन दोन फूट उंचीच्या मूर्ती आम्ही पाहिल्या आहेत. परंतु त्या शास्त्रशुद्ध नव्हेत.

## चल आणि स्थिर मूर्ती

मूर्तीत 'चल आणि स्थिर' असेही दोन आणखी भेद आहेत. चल म्हणजे बाहेरगावी नेता येण्याजोगी मूर्ती. स्थिर ही मात्र बाहेरगावी नेता येत नाही. ती देवघरातच ठेवावी लागते.

मूर्तीकडे मूर्ती म्हणून न पाहता तिच्यात देवत्व कल्पून तिच्याकडे 'देव' म्हणूनच पाहावे व तिची योग्य पद्धतीने जपणूक करावी. ती खाली पडू देऊ नये, तसेच तिच्यावर फार गरम पाणी ओतू नये.

## मूर्ती किती असाव्यात ?

स्मृतीकारांनी एके ठिकाणी याबाबत पुढील नियम दिले आहेत. ते म्हणतात –

**'एका मूर्तिर्न पूज्यैव गृहिणा स्वष्ट मिच्छता ।**
**अनेकमूर्ति संपन्नः सर्वान्कामानवाप्नुयात्**

याचा अर्थ, गृहस्थाने घरात केवळ एकाच मूर्तीची पूजा करू नये. मूर्ती एकाहून अधिक असाव्यात.

## मूर्ती कोणत्या धातूच्या असाव्यात ?



देवपूजेसाठी माती किंवा शाडूच्या मूर्ती अर्थातच उपयोगाच्या नाहीत. कारण त्यांच्यावर पाणी वा दुधाचा अभिषेक करता येणार नाही. या मूर्ती सोने, चांदी, तांबे, पितळ, पाषाण वा रत्नांच्या असाव्यात असे शास्त्र सांगते.

## स्वयंभू आणि कृत्रिम मूर्ती

- देव मूर्तीत दोन प्रकार पडतात.

१) स्वयंभू आणि २) कृत्रिम

यापैकी स्वयंभू मूर्ती निसर्गानेच बनविलेल्या असतात. त्या घडविण्यासाठी कारागीर लागत नाही. उदाहरणार्थ शाळिग्राम इ. या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करावी लागत नाही.

दुसरा प्रकार म्हणजे कृत्रिम. या मूर्ती मुद्दाम छिन्नी हातोडीच्या वा साच्याच्या साहाय्याने कारागिरांनी बनविलेल्या असतात. **कृत्रिम मूर्तींची देवघरात स्थापना करण्यापूर्वी प्राणप्रतिष्ठेचे मंत्र म्हणून त्यांची प्राणप्रतिष्ठा करावी लागते. त्याशिवाय त्यांना देवत्व प्राप्त होत नाही.**

## हात, मुख व वाणीनुसार भेद

या देवमूर्तीत हात, मुखे आणि वर्ण यानुसार अनेक भेद आहेत. उदाहरणार्थ श्री गणेशाला चार हात तर गायत्री देवीला दहा हात. श्रीदत्ताला तीन मुखे तर गायत्री देवीला पाचमुखे त्याचप्रमाणे वर्णानुसार, शुभ्र, नील, पीत, रक्त व कृष्ण असेही भेद आहेत.

या मूर्ती वेगवेगळ्या देवदेवतांच्या असाव्यात. अनेक मूर्तींची पूजा करणाऱ्याला सर्व इष्ट फले मिळतात.

मात्र घरात (पूजेत) दोन शिवलिंगे, तीन गणेशमूर्ती, दोन शंख, दोन सूर्य प्रतिमा, तीन देवी प्रतिमा, दोन द्वारकाचक्रे (विष्णुचक्रे), दोन शाळिग्राम नसावेत. तसे असल्यास पूजकाला उद्वेग प्राप्त होतो.

स्कंद पुराणात म्हटले आहे की, कलियुगात देवपूजा करणाऱ्याला मुक्ती ही मिळतेच, मग त्याची भक्ती असो वा नसो.

## मूर्तीची प्राणप्रतिष्ठा

देवमूर्तीची 'प्राणप्रतिष्ठा' केल्याशिवाय तिला देवत्व प्राप्त होत नाही. व अशा देवत्व नसलेल्या मूर्तीची पूजा कितीही उपचारांनी केली तरी तिचा काहीही उपयोग होत नाही. त्यामुळे प्राणप्रतिष्ठेचा विधी जाणकार गुरूजींकडून करून घेणे आवश्यक आहे. प्राणप्रतिष्ठा केल्यानंतरही, शक्य झाल्यास त्या मूर्ती त्या त्या दैवताच्या जागृतस्थानी (उदा. नरसोबाची वाडी, गाणगापूर, कोल्हापूर इ.) तेथील मूर्तीला स्पर्श करून आणाव्यात. म्हणजे त्यांच्याठायी विशेष शक्ती निर्माण होते.

मूर्तीप्रमाणेच श्रीयंत्र, दत्तयंत्र इ. सर्व यंत्रांची व पादुकांचीही (धातूच्या) प्राणप्रतिष्ठा करणे आवश्यक असते. प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वी मूर्ती भंगली वा खाली पडली तर कसलाही दोष नाही. प्राणप्रतिष्ठित मूर्तीची मात्र नीट काळजी घेणे आवश्यक आहे. (प्राणप्रतिष्ठेचे मंत्र शेवटी दिले आहेत.)

## सोवळे व भस्मलेपन

देवपूजा शक्यतो स्नानानंतर सोवळे नेसूनच करावी. ते अगदीच शक्य नसेल तर धूत वस्त्रे नेसून करावी. मात्र अंगावर शाल वगैरे काहीतरी असावे. त्या ऐवजी एक जानवे अधिक घातले तरी चालते. काही लोकांच्या घरचे सोवळे वर्षानुवर्षे धुतले जात नाही. हे चूक आहे. सोवळे दर पंधरा-वीस दिवसांनी स्वच्छ धुवावे. तसेच आपले सोवळे इतरांना देऊ नये. तसेच कपाळावर भस्मलेपनही करावे.

## संध्या, गायत्री आवश्यक


ज्यांची मुंज झाली आहे, अशांनी देवपूजेपूर्वी संध्या व किमान १०८ (किंवा निदान २८) गायत्रीजप अवश्य करावा. कारण त्यायोगे मन व शरीराची अंतर्बाह्य शुद्धी होते. आपल्या शास्त्रात त्रिकालसंध्या करावयास सांगितले

आहे. परंतु हल्लीच्या धावपळीच्या दिवसात त्रिकालसंध्या सर्वांनाच शक्य होईलसे वाटत नाही. म्हणून सकाळी एकदा तरी संध्यावंदन करावे. कारण संध्येचे अनेक फायदे आहेत. ते अनुभवानेच लक्षात येतील.

## पंचायतन मांडणी

सूर्य, गणेश, शिव, विष्णू आणि देवी या पाच दैवतांची एकत्र पूजा म्हणजेच पंचायतन पूजा होय. ही पूजा आद्य शंकराचार्यांनी प्रचलित केली असे म्हणतात. निर्णयसिंधू सारख्या सर्वमान्य ग्रंथात ही पंचायतन मांडणी पुढीलप्रमाणे करावी असे सांगितले आहे. ही पूजा पूज्यपाद आद्य शंकराचार्यांनी रूढ केली.

ज्या देवतेचे पंचायतन असेल ती देवता मध्यभागी ठेवावी. पंचायतनातील देवतांचा क्रम ठरवून दिल्याप्रमाणेच असावा. तो चुकल्यास मोठे भय निर्माण होते असे म्हणतात, सोबतच्या चित्रावरून ही मांडणी वाचकांच्या लक्षात येईल.



## श्रीगणेश पंचायतन




## श्री शिव पंचायतन





## श्री विष्णू पंचायतन




## श्री देवी पंचायतन




## श्री सूर्य पंचायतन



## हे लक्षात ठेवा

भस्मधारण करून, तसेच संध्या गायत्री झाल्यावर प्रसन्न मनाने देवपूजेला सुरुवात करावी. पुढील काही महत्त्वाचे नियम मात्र नीट लक्षात ठेवावेत.

१) देव आपल्यापेक्षा उच्च आसनावर ठेवावेत.

२) देवासमोर समई लावलेली असावी. मात्र, तिचे तोंड दक्षिणेकडे नसावे. सुगंधी उदबत्तीही लावावी. त्यायोगे वातावरण प्रसन्न होते व मन एकाग्र होण्यास मदत होते.

३) पूजा ही कशीतरी उरकायची गोष्ट नाही. ती पूर्ण एकाग्रतेने व प्रसन्न मनानेच करावी.

४) प्राणप्रतिष्ठा केलेल्या मूर्तीच पूजेत ठेवाव्यात.

५) कांदा व लसूण असलेले पदार्थ देवाच्या नैवेद्यात असू नयेत.

६) देवाला नैवेद्य दाखविल्यावर तो नैवेद्य लगेच खाऊ नये. थोडावेळ तिथेच ठेवावा व देवाने तो ग्रहण केला अशी कल्पना करून मगच आपण खावा व इतरांना वाटावा.

७) देवाची आरती करताना निरांजन देवाच्या मस्तकावरून कधीही नेऊ नये.

८) पोथीची पाने उलटताना नेहमीच्या सवयीप्रमाणे तांडातील थुंकी लावून ती उलटू नयेत.

९) देवातील शंखाला अक्षता वाहू नयेत.

१०) भग्न मूर्तीची पूजा कधीही करू नये. ती मूर्ती विसर्जन मंत्र म्हणून विसर्जन करावी.

११) पोथीवाचन व आरत्या मनात न म्हणता मोठ्याने म्हणाव्यात. जप फक्त मनात करावा.

१२) देवपूजेला प्रारंभ करण्यापूर्वी आचमन व प्राणायाम करून

'श्रीपरमेश्वरकृपा प्राप्त्यर्थं परमेश्वर पूजां करिष्ये' असा संकल्प सोडून पाणी ताम्हनात सोडावे. असे नियम पुष्कळ आहेत. परंतु महत्त्वाचे तेवढे येथे दिले आहेत.

## देवासाठी फुले

देवासाठी शक्यतो स्वत: झाडावरून तोडलेली फुले वापरावीत. रस्त्यावर विक्रीसाठी मांडलेली किंवा रस्त्यावर पडलेली फुले, तसेच चोरून आणलेली फुले न वाहणेच चांगले. पूजेच्या शेवटी देवावर अक्षता वाहताना आपण 'सर्वोपचारार्थे अक्षतां समर्पयामि' असे म्हणतोच त्यात सर्व आले. चांगली फुले न मिळाल्यास देवाला अत्तर लावावे.

फूल, पान व फळ देवावर कधीही उपडे वाहू नये. या गोष्टी झाडावर जशा उगवतात तशाच स्थितीत वाहाव्यात. देवावर कळ्या वाहणेही चूक आहे.

आता कोणत्या देवाला कोणती फुले प्रिय व वर्ज्य आहेत हे पाहूया.

**विष्णू, शिव – पांढरी फुले, गणपती, देवी व सूर्य – तांबडी फुले. श्रीगणेशाला दुर्वा तर शिवाला बेल व दत्त, राम, कृष्ण व विष्णूला तुळस अत्यंत प्रिय आहे. देवीला बकुळ, जाई, मोगरा, कमळ व कण्हेर प्रिय तर विष्णूला तसेच रामाला केवडा, चाफा, मोगरा, गुलाब व कमळ प्रिय आहे. पारिजातक मोगरा, चाफा, बकुळ व कण्हेर सर्वांनाच प्रिय आहेत. शाळीग्रामाला अक्षता कधीही वाहू नयेत.**

आता शास्त्रशुद्ध पद्धतीने पूजा कशी करावी ते पाहू.

## उपचार

या नंतर देवपूजेतील विविध उपचारांची माहिती पाहू :

**तंत्र ग्रंथात देवपूजेसाठी तीन, पाच, सात, दहा, बारा, सोळा, अठरा, छत्तीस, अडतीस, चौसष्ट इ.** विविध उपचार सांगितले आहेत.

(काही ग्रंथात यापेक्षाही अधिक उपचार दिले आहेत.) इष्टदेवतेची पूजा **सोळा, दहा किंवा पाच** उपचारांनी करावी असे सनत्कुमार तंत्रात सांगितले आहे.

यासाठीच पंचोपचार व षोडशोपचार यांची माहिती असणे आवश्यक आहे.

## पंचोपचार

षोडशोपचार पूजा करणे अशक्य असल्यास पंचोपचार पूजा करावी. पंचोपचारात (१) गंध, (२) पुष्प, (३) धूप, (४) दीप व (५) नैवेद्य या पाच उपचारांचा समावेश होतो.

'तिथितत्त्व' ग्रंथात असे सांगितले आहे, की पंचोपचार पूजनही अशक्य असेल त्यावेळी गंध व पुष्पे या दोन उपचारांनीच पूजा करावी.

## षोडशोपचार

आता षोडशोपचार (सोळा उपचार) कोणते ते पाहू.

(१) आवाहन, (२) आसन, (३) पाद्य, (४) अर्घ्य, (५) आचमन, (६) स्नान, (७) वस्त्र, (८) उपवस्त्र, (उपवीत) (९) गंध, (१०) पुष्प, (११) धूप, (१२) दीप, (१३) नैवेद्य, (१४) प्रदक्षिणा, (१५) नमस्कार व (१६) मंत्रपुष्प, या उपचारांनाच '**षोडशोपचार**' असे नाव आहे. यासाठी 'पुरूषसूक्ता' तील एकेक ऋचा एकेका उपचारासाठी वापरतात.

आता या उपचारांची थोडक्यात माहिती पाहू.

**१) आवाहन** – आवाहन म्हणजे निमंत्रण किंवा बोलावणे. ज्या देवतेची पूजा करावयाची त्या देवतेने मूर्तीत आपली अंगे, परिवार, आयुधे आणि शक्ती यांसह येऊन प्रतिष्ठित व्हावे व आपली पूजा ग्रहण करावी अशी आवाहनात विनम्र प्रार्थना असते. आवाहनाच्या वेळी देवावर अक्षता किंवा

तुलसीपत्र वाहतात व '**अमुक देवतायै नम:**' किंवा '**अमुक देवताभ्यो नम:**' असे म्हणून हात जोडतात.

**वेदोक्त आवाहन मंत्र:**

**ॐ सहस्रशीर्षा पुरूष: सहस्राक्ष: सहस्रपात्।**

**स भूमिं विश्वतो वृत्वाऽत्सतिष्ठद्दशाङ्गुलम्।**

**अर्थ** – विराट अशा पुरुषाला हजारो नेत्र व हजारो पाय आहेत. तो भूमीला सर्वस्वी व्यापून आणि दहा आंगुळे वर उरलाच आहे.

**पुराणोक्त आवाहन मंत्र**

**आगच्छ देवदेवेश तेजोराशे जगत्पते**

**क्रियमाणां मया पूजां गृहाण सुरसत्तम।**

**ॐ देवदेवताभ्यो नम:**

**(आवाहनार्थ अक्षतान् समर्पयामि)**

**अर्थ** – देवेदेवेश्वरा! तेजोराशे! जगतांच्या नाथा! देवातील उत्कृष्ट देवा! मी करीत असलेल्या पूजेचा स्वीकार करावा!

सर्व देवदेवतांना नमस्कार!

आवाहनासाठी अक्षता अर्पण करीत आहे,

यावेळी ॐ म्हणावे व देवाला नमस्कार करून, ओंजळीत गंध-अक्षता व फुले घेऊन ती वाहावीत.

**२) आसन** – देवाचे आगमन झाल्यानंतर त्याला बसण्यासाठी आसन नको का? यासाठी देवाला बैठकीखाली पाच फुले ठेवावीत. अन्यथा अक्षता वहाव्यात. विष्णूच्या आसनाखाली तुलसीपत्रे ठेवावीत.

**वेदोक्त आसन मंत्र**

**ॐ पुरूष एवेदं सर्व यद्भूतंयच्च भव्यम्।**

**उतामृतत्वस्येशानो यदन्नेतिरोहति॥**

**अर्थ :** हे विद्यमान जग म्हणजे हा आदिपुरुषच आहे. अमृतत्त्वाचा स्वामी हाच आहे. त्याला केवळ इच्छा झाली म्हणूनच तो प्राणिमात्रांना निमित्तभूत असे जे अन्न त्या द्वारे या जगात प्रकट झाला आहे.

**पुराणोक्त आसन मंत्र:**

**नानारत्नसमायुक्तं कार्तस्वरविभूषितम् ।**
**आसनं देवदेवेश प्रीत्यर्थं प्रतिगृह्यताम् ।।**

**अर्थ** – हे देवाधिदेवा! नाना रत्नांनी युक्त आणि सोन्याचे मढविलेले असे हे आसन तू संतुष्ट व्हावासा म्हणून मी तुला देत आहे. ते घेण्याची तू कृपा कर. (येथे सोन्याचे आसन हे अर्थातच काल्पनिक आहे. आसन म्हणून त्या त्या देवतेप्रमाणे फूल, दूर्वा, बेल, तुळस इ. ठेवावे. किंवा अक्षतांचे आसन अर्पण करावे.)

**३) पाद्य** – पाद्य म्हणजे पाय धुण्यासाठी पाणी देणे. यावेळी देव ताम्हनात ठेवून त्यांचेवर पळीने पाणी घालावे.

**वेदोक्त पाद्य मंत्र :**

**ॐ एतावानस्य महिमातो ज्यायांश्च पुरुषः ।**
**पादोस्य विश्वभूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ।।**

**अर्थ** – याचा महिमा काय वर्णावा ? या सर्व दृश्य विश्वापेक्षा तो कितीतरी मोठा आहे. या विश्वातील चराचर सृष्टी हा केवळ त्याचा एक चतुर्थांश भाग द्युलोकात आहे.

**पुराणोक्त पाद्य मंत्र:**

**पाद्यं गृहाण देवेश सर्वक्षेमसमर्थ भो ।**
**भक्त्या समर्पितं देव लोकनाथ नमोस्तुते ।।**

**अर्थ** – हे देवाधिदेवा! तू सर्वांचे क्षेम करण्याला समर्थ आहेस. हे लोकनाथा! चरण प्रक्षालनासाठी हे पाद्य (पाणी) मी तुला भक्तिपूर्वक समर्पण

करीत आहे. याचा स्वीकार कर.

४) **अर्घ्य** – त्यानंतरचा उपचार म्हणजे अर्घ्य. म्हणजे देवाचे पाय धुणे झाल्यावर त्याला हात धुण्यासाठी ओंजळभर जल द्यावयाचे असते, त्यालाच 'अर्घ्य' म्हणतात संध्येच्या पळीत गंध, पुष्प, अक्षता, दूर्वा इ. वस्तू घालून ते पाणी अर्घ्य म्हणून देवाला वाहतात.

**वेदोक्त अर्घ्य मंत्र:**

**ॐ त्रिपादूर्ध्व उदैत्पुरुषः पादोस्येहाभवत्पुनः।**
**ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि ॥**

**अर्थ** – द्युलोकात ज्योतिरूपाने राहिलेल्या ह्या आदिपुरुषाचा एक अंश उत्पत्ती, स्थिती आणि लय अशा प्रकारे या विश्वात पुनः पुन्हा प्रकट होतो. सचेतन असे प्राणिसमुदाय आणि अचेतन सृष्टी या सगळ्यात अनेक रूपांनी तो वावरत आहे.

**पुराणोक्त अर्घ्य मंत्रः**

**नमस्ते देवदेवेश नमस्ते धरणीधर।**
**नमस्ते जगदाधारा अर्घ्यं नः प्रतिगृह्यताम् ॥**

**अर्थ** – हे देवाधिदेवा तुला नमस्कार असो. तू सगळ्या जगाचा आधार आहेस. तुला पुन्हा नमस्कार करून हे अर्घ्य देत आहे, त्याचा स्वीकार कर. एवढे म्हणून पळीतील पाणी अर्पण करावे.

५) **आचमन** – आचमन याचा अर्थ देवाला पाणी देणे.

**वेदोक्त आचमन मंत्र :**

**ॐ तस्माद्विराळजायत विराजो अधि पुरूषः।**
**स जातो अत्यरिच्यत पश्चाद् भूमिमथो पचरः ॥**

**अर्थ** – त्या आदिपुरुषापासून ज्याच्या ठायी विविध वस्तू झळकत असतात असा विराट (देह) उत्पन्न झाला. त्याच्या आश्रयाने एक

(देहाभिमानी) पुरुष (परमात्मा) आपल्या मायेच्या शक्तीने ब्रह्माण्ड उत्पन्न करून स्वत: त्यातच प्रविष्ट झाला आणि त्यातूनच पुढे अखिल सृष्टिजात निर्माण झाली.

नमस्कार करून देवाला पळीने जल अर्पण करावे.

**पुरोणोक्त आचमन मंत्र :**

**कर्पूरवासितं तोयं मन्दाकिन्या: समाहृतम् ।।**
**आचम्यतां जगन्नाथ मया दत्तं हि भक्तित: ।**

**अर्थ** – हे जगन्नाथा, कापुराने सुगंधित केलेले हे गंगाजल मी भक्तिपूर्वक तुला अर्पण करीत आहे. (असे म्हणून एक पळीभर पाणी ताम्हनात सोडावे. आचमन हे देवाला चूळ भरण्यासाठी असते.)

**६) स्नान** – स्नान म्हणजे देवावर पाणी घालणे. मातीच्या मूर्ती असल्यास पाणी न घालता फुले, तुलसीपत्रे, यांनी फक्त देवावर पाणी शिंपडावे.

**वेदोक्त स्नान मंत्र :**

**ॐ यत्पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत ।**
**वसन्तो अस्यासीदाज्यं ग्रीष्म इध्म: शरद्धवि: ।।**

**अर्थ** – देवांनी नंतर या पुरुषाच्या स्वरूपाचा हविर्भाग करून मानसिक यज्ञ आरंभिला. त्यात वसंत ऋतू हे तूप, ग्रीष्म हे इंधन आणि शरद हा हवि:शेष कल्पिला.

**पुराणोक्त स्नान मंत्र :**

**गंगा - सरस्वती - रेवा पयोष्टी - नर्मदाजलै: ।**
**स्नापितोऽसि मया देव तथा शांतिं कुरुष्व मे ।।**

**अर्थ** – हे देवा ! गंगा, सरस्वती, रेवा, पयोष्टी, नर्मदा इत्यादी नद्यांच्या पाण्याने मी तुला स्नान घालीत आहे. तू माझ्या मनाला शांती दे.

या मंत्राने पंचामृत स्नान घालावे. पंचामृतात दूध, दही, तूप, मध आणि

साखर यांचा समावेश होतो.

पंचामृत स्नानाच्या वेळी पुढील मंत्र म्हणावा.

**पयो दधि घृतं चैव मधुशर्करया युतम् ।**
**पंचामृतेन स्नपन क्रियतां परमेश्वर ।।**

**अर्थ** – पंचामृताच्या स्नानाने हे परमेश्वरा, तू प्रसन्न हो.

यानंतर देवाला महाभिषेक स्नान घालावे. महाभिषेक म्हणजे देवाव संततधार धरणे. यासाठी अभिषेक पात्राचा उपयोग करावा. यावेळ श्रीविष्णूसाठी '**पुरूषसूक्त**', '**पवमान**', किंवा '**विष्णूसूक्त**', **शिवासार्ठ** '**रूद्राध्याय**', '**रूद्रसूक्त**', **श्रीगणेशासाठी** '**श्रीगणेश अथर्वशीर्ष**' श्रीसूर्यासाठी '**सौरसूक्त**', देवीसाठी '**श्रीसूक्त**' म्हणण्याचा प्रघात आहे नुसते '**पुरूषसूक्त**' म्हटले तरी सर्व देवांना चालते.

त्यानंतर 'श्रीआराध्यदैवताहै नम:' असे म्हणून ताम्हनात पाणी सोडावे आणि पुन्हा आचमनासाठी पाणी वहावे. त्यावेळी - 'महाभिषेकस्नानान्तरेण आचमनीयं समर्पयामि' असे म्हणावे.

**७) वस्त्र** – यानंतर देवाला दोन वस्त्रे समर्पण करावीत. त्याचा मंत्र असा

**वेदोक्त वस्त्र समर्पण मंत्र :**

**ॐ तं यज्ञं बर्हिषि प्रोक्षन्पुरुषं जातमग्रत: ।**
**तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ।।**

**अर्थ** – त्या यज्ञसाधनाभूत पुरुषावर प्रोक्षण करण्यात आले. त्या प्रथम झालेल्या जीवांनी यज्ञ केल्यामुळे सृष्टी उत्पन्न करण्यास समर्थ असे देव आणि सृष्टी संरक्षण करण्यास आवश्यक ज्ञान देणारे ऋषि उत्पन्न झाले.

**पुराणोक्त वस्त्र समर्पण मंत्र:**

**सर्वभूषाधिके सौम्यं लोकलज्जानिवारणे ।।**
**मयोपपादिते तुभ्यं वाससी प्रतिगृह्यताम् ।।**

**अर्थ** – सर्व भूषणांमध्ये श्रेष्ठ, सौम्य, लज्जा निवारण करणारी अशी मी तयार केलेली (आणलेली) दोन वस्त्रे तुला अर्पण करीत आहे, त्यांचा कृपया स्वीकार कर.

**८) उपवस्त्र (यज्ञोपवीत समर्पण) :** यानंतर देवाला जानवे वाहावे. त्याचे मंत्र असे :

**वेदोक्त यज्ञोपवीत समर्पण मंत्र :**

**ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुत: संभृतं पृषदाज्यं ।**
**पशूंस्तांश्चक्रे वायव्यानारण्यान् ग्राम्याश्च् ये ।।**

**अर्थ** – ह्या यज्ञापासून दही, तूप इ. पोषणाला आवश्यक असे पदार्थ उत्पन्न झाले. त्याचप्रमाणे वन्य व ग्राम्य पशु जे वायूवर पोसतात हेही त्या यज्ञापासून उत्पन्न झाले.

**पुराणोक्त यज्ञोपवीत समर्पण मंत्र :**

**देवदेव नमस्तेऽस्तु त्राहिमां भवसागरात् ।**
**ब्रह्मसूत्रं सोत्तरीयं गृहाण पुरुषोतम् ।।**

**अर्थ** – हे देवाधिदेवा, तुला नमस्कार असो. हे ब्रह्मसूत्र (जानवे) उत्तरीय वस्त्रासह (मी) तुला देत आहे. त्याचा स्वीकार कर आणि भवसागरापासून माझे रक्षण कर.

**९) चंदन (गंधसमर्पण)** – हा नववा उपचार. याबद्दलची अधिक माहिती सुरुवातीलाच आली आहे. आता मंत्र पाहू.

**वेदोक्त चंदन समर्पण मंत्र :**

**ॐ तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋच:सामानि जज्ञिरे ।**
**छन्दांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत ।।**

**अर्थ** – या यज्ञामुळेच ऋग्वेद, आणि सामवेद तसेच गायत्र्यादी छंद निर्माण झाले.

**पुराणोक्त चंदन समर्पण मंत्र :**


**श्रीखण्डं चंदनं दिव्यं गंधाढ्यं सुमनोहरम् ।**
**विलेपनं सुरश्रेष्ठ चंदनं प्रतिगृह्यताम् ।।**

**अर्थ** – हे सुरश्रेष्ठा, अत्यंत मनोहर व सुगंधाने परिपूर्ण असे हे चंदन गंध मी तुला लावीत आहे, त्याला स्वीकार कर.

मंत्रानंतर '**विलेपनार्थे चंदनं समर्पयामि**' असे म्हणून करांगुलीजवळच्या बोटाने सर्व देवांना गंध लावावे... यावेळी देवीला गंधाच्या ऐवजी किंवा गंधाबरोबर हळद-कुंकू लावण्याची पद्धत आहे. त्यावेळी '**श्रीदेव्यैनमः हरिद्रा कुंकुमं समर्पयामि**' एवढे म्हटले तरी चालेल.

गंधानंतर कुंकुमयुक्त अक्षताही वाहाव्यात. मात्र, अक्षता हा उपचार सोळा उपचारात येत नाही.

**१०) पुष्प समर्पण** – हा दहावा उपचार.



**वेदोक्त पुष्पसमर्पण मंत्र :**

**ॐ तस्मादश्वा अजायन्त ये के चोभयादतः ।**
**गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः ।।**

**अर्थ** – वर उल्लेखिलेल्या यज्ञापासून घोडे, दोन्ही बाजूंना दात असलेले इतर पशु-गायी, मेंढ्या वगैरे प्राणी उत्पन्न झाले.

**पुराणोक्त पुष्प समर्पण मंत्र :**

**माल्यादीनि सुगंधीनि मालत्यादीनि वै प्रभो।**
**मयाहृतानि पूजार्थं पुष्पाणि प्रतिगृह्यताम् ।।**

**अर्थ** – हे प्रभो, मालती-जाई-जुई इत्यादी सुगंधी फुले आपल्या पूजेकरिता आणली आहेत. त्याचा स्वीकार कर.

श्रीविष्णूच्या पूजेत '**ॐ केशवाय नमः**' इ. २४ नावे म्हणत तुलसीपत्रे वाहावीत. श्रीगणेशाला शमी व दुर्वा वाहाव्यात.

**११) धूप** – देवघरातील वातावरण सुगंधित व्हावे व अनिष्ट शक्तींनी तेथून निघून जावे यासाठी देवापुढे धूप जाळण्याची प्रथा आहे. (उदबत्त्या जाळूनही या उपचाराची पूर्तता होते.)

**वेदोक्त धूप समर्पण मंत्र :**

**ॐ यत्पुरूषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन्।**
**मुखं किमस्य कौ बाहू का उरू पादा उच्येते ।।**

**अर्थ** – हा जो विराट पुरूष उत्पन्न केला गेला तो किती प्रकारे उत्पन्न केला गेला ? त्याच तोंड कोणते ? हात कोणते ? मांड्या कोणत्या आणि पाय कोणते म्हटले जातात ?

**पुराणोक्त धूप समर्पण मंत्र :**

**वनस्पतिरसोद्भूतो गंधाढ्यो गंध उत्तमः।**
**आघ्रेयः सर्वदेवानां धूपोऽयं प्रतिगृह्यताम् ।।**

**अर्थ** – वनस्पतींच्या रसांपासून उत्पन्न झालेला, सुगंधित पदार्थात उत्तम आणि म्हणूनच सर्व देवांना वास घेण्याला योग्य असा हा धूप मी तुला अर्पण करतो, त्याचा (तू) स्वीकार कर. (धूप नसल्यास उदबत्ती वापरावी.)

**१२) दीप समर्पण** – दीप समर्पण म्हणजे निरांजन ओवाळणे. याचवेळी डाव्या हाताने घंटाही वाजवावी. आरती म्हणावी. दीप समर्पणाचे

मंत्र असे :

**वेदोक्त दीप समर्पण मंत्र :**

**ॐ ब्राह्मणोस्य मुखमासीद्बाहू राजन्य: कृत: ।**
**ऊरू तदस्य यद्वैश्य: पद्भ्यां शूद्रो अजायत ।।**

**अर्थ** – ब्राह्मण हे त्याचे मुख होते. क्षत्रिय हे त्याचे बाहू, वैश्य हे त्याचे मांड्या व हात, शूद्र हे पायांपासून उत्पन्न झाले.

**पुरोणोक्त दीप समर्पण मंत्र :**

**आज्यं च वर्तिसंयुक्तं वह्निना योजितं मया ।**
**दीपं गृहाण देवेश त्रैलोक्यतिमिरापह ।।**

**अर्थ** – त्रैलोक्याचा अंध:कार दूर करणाऱ्या हे देवाधिदेवा, तूप आणि चांगली फुलवात घालून पेटविलेल्या ह्या दिव्याचा तू स्वीकार कर.

या वेळी निरांजन प्रदीप्त (पेटवून) करून देवाला आपल्या डावीकडून तीन वेळा ओवाळावे. त्यावेळी डाव्या हाताने घंटा वाजवावी.

**१३) नैवेद्य** – म्हणजेच देवासाठी भोजन समर्पण करावे.

**वेदोक्त नैवेद्य समर्पण मंत्र :**

**ॐ चंद्रमा मनसो जातश्चक्षो: सूर्यो अजायत ।**
**मुखादिन्द्रश्चाग्निश्च प्राणाद्वायुरजायत ।।**

**अर्थ** – त्याच्या मनापासून चंद्र झाला, डोळ्यापासून इंद्र व अग्नी आणि प्राणापासून वायू उत्पन्न झाला.

**पुरोणोक्त नैवेद्य समर्पण मंत्र :**

**नैवेद्यं गृह्यतां देव भक्तिं मे ह्यचलां कुरू ।**
**ईप्सितं मे वरं देहि परत्र च परां गतिम् ।।**

**अर्थ** – हे देवा, हा नैवेद्य घे. तुझ्या ठिकाणी माझी भक्ती अचल राहू दे.

इहलोकी माझ्या मनोकामना पूर्ण कर आणि परलोकी उत्तम गती मिळेल असे कर.

यावेळी दूध-साखर, खडीसाखर, खोबऱ्याचा कीस, खीर इ. पदार्थ किंवा महानैवेद्य असेल तर पंचपक्वान्नांनीयुक्त असे ताट देवापुढे ठेवावे.

हा नैवेद्य अर्पण करताना डावा हात आपल्या डोळ्यांवर धरून उजव्या हाताने आपण जणू देवाला भरवीत आहोत अशी कृती करावी.

नैवेद्याचे ताट व वाटी ठेवण्यापूर्वी त्याखाली पाण्याने चतुष्कोणाकृती मंडल काढावे. नंतर त्यावर तुलसीपत्राने प्रोक्षण करावे व ते तुलसीपत्र त्या नैवेद्यावर ठेवावे. नंतर वर लिहिल्याप्रमाणे देवाला घास भरविताना **ॐ प्राणाय स्वाहा, ॐ अपानाय स्वाहा, ॐ व्यानाय स्वाहा, ॐ उदानाय स्वाहा, ॐ समानाय स्वाहा व ॐ ब्रह्मणे स्वाहा** ' असे मनात म्हणावे.

जेवताना आपल्याप्रमाणेच देवालाही मधेच पाणी लागते. त्यासाठी पाणी ठेवून '**नैवेद्यमध्ये पानीयं समर्पयामि**' असे म्हणावे. अखेरीस, 'भोजन पूर्ण झाल्यावर पिण्यासाठी पाणी देत आहे त्याचा हे देवा तू स्वीकार कर' असे सांगण्यासाठी '**उत्तरापोशनं समर्पयामि**' असे म्हणावे. नंतर देवाचे हात, मुख इ. धुण्यासाठी '**श्रीमहाविष्णु प्रमुख पंचायतन देवताभ्यो नमः हस्तप्रक्षालनं समर्पयामि । मुखप्रक्षालनं समर्पयामि । करोद्वर्तनार्थं चंदनं समर्पयामि**' असे म्हणत ताम्हनात पाणी सोडावे.

या जास्तीच्या क्रिया शक्यतो महापूजेतील महानैवेद्य दाखविताना करण्याचा प्रघात आहे.

भोजनोत्तर देवाला तांबुल, श्रीफल व दक्षिणा समर्पण करावी. त्यावेळी, '**मुखवासार्थे पूगीफल तांबूलं समर्पयामि**' व '**सुवर्णपुष्प दक्षिणां समर्पयामि**', '**नारिकेल फलं समर्पयामि**' असे म्हणावे.

श्रीमंत लोक यानंतर छत्र, चामर, दर्पण, गीत, वाद्य, नृत्य इ. द्वारा देवाला संतुष्ट करतात; परंतु सर्वसामान्य मनुष्य हे सर्व करू शकत नसल्याने

शास्त्रकारांनी त्याचीही सोय करून ठेवली आहे. ह्यासाठी '**शेषोपचारार्थे अक्षतान् समर्पयामि**' असे म्हणून देवावर अक्षता वहाव्यात किंवा '**नमस्करोमि**' असे म्हणून केवळ नमस्कार करावा.

यानंतर पुढील तीन उपचार करण्यापूर्वी निरांजनाने देवाची आरती करावी. काही लोक यावेळी पंचारती (पाच वातींनी केले आरती) ओवाळतात.

**१४) नमस्कार –** यानंतर देवापुढे एक, दोन, तीन किंवा पाच साष्टांग नमस्कार घालावेत.

### वेदोक्त नमस्कार मंत्र :

**ॐ सप्तास्यासन्परिधयस्त्रिः सप्त समिधः कृताः ।**
**देवा यद्यज्ञं तन्वाना अबध्नन्पुरुषं पशुम् ॥**

**अर्थ –** पूर्वी वर्णन केलेल्या यज्ञात गायत्र्यादी सात छंद हे परिधि आणि महिने, ऋतु, तीन लोक आणि सूर्य मिळून एकवीस समिधा अशी कल्पना करून देव यज्ञ करू लागले आणि विराट पुरुषाला, म्हणजेच साऱ्या जीवसृष्टीलाच त्यांनी यज्ञीय पशु कल्पिला.

### पुराणोक्त नमस्कार मंत्र :

**नमोस्त्वनंताय सहस्त्रमूर्तये सहस्त्रपादाक्षिशिरोरूबाहवे ।**
**सहस्त्रनाम्ने पुरूषाय शाश्वते सहस्त्रकोटियुगधारिणे नमः ॥**
**नमः सर्वहितार्थाय जगदाधार हेतवे ।**
**साष्टांगोऽयं प्रणामस्ते प्रयत्नेन मया कृताः ॥**

**अर्थ –** ज्याला कधी अंत नाही, ज्याची हजारो रूपे आहेत, हजारो रूपांनी जो नटलेला आहे, ज्याला हजारो पाय हजारो डोळे आहेत तसेच, कोट्यावधी युगांचा जो आधार आहे, त्या शाश्वत पुरूषाला माझा नमस्कार असो.

(असे म्हणून देवाला तीन किंवा पाच साष्टांग नमस्कार घालावेत)

**१५) प्रदक्षिणा** – हा पंधरावा उपचार. यावेळी पुढील मंत्र म्हणावा.

**वेदोक्त प्रदक्षिणा मंत्र :**

**ॐ नाभ्या आसीदंतरिक्षं शीर्ष्णो द्यौः समवर्तत।**
**पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथा लोकाँ अकल्पयन्।।**

**अर्थ** – या महपुरुषाच्या नाभीपासून अंतरिक्ष (आकाश) मस्तकापासून द्युलोक, पायापासून भूमि (पृथ्वी) आणि श्रवणेंद्रियापासून दिशा उत्पन्न झाल्या. तात्पर्य, सर्व लोक याच्यापासूनच उत्पन्न केले गेले आहेत.

**पुराणोक्त प्रदक्षिणा मंत्र :**

**यानि कानि च पापानि जन्मांतरकृतानि च ।**
**तानि तानि विनश्यन्ति प्रदक्षिण पदे पदे ।।**
**(ॐ देवताभ्यो नमः प्रदक्षिणां समर्पयामि)**

**अर्थ** – जन्मजन्मांतरी माझी केलेली जी काही पापे असतील ती प्रदक्षिणेच्या पावला पावलाला नष्ट होतात अशा संकल्पाने मी प्रदक्षिणा करतो.

देवाभोवती प्रदक्षिणेसाठी जागा नसेल तर स्वतः भोवती प्रदक्षिणा घालून नंतर देवाला नमस्कार करावा.

**१६) मंत्रपुष्प** – हा सोळावा उपचार होय. यातच आरती, राष्ट्रीय प्रार्थना, जयघोष इ. चा समावेश होतो.

**वेदोक्त मंत्रपुष्प :**

**ॐ यज्ञेन यज्ञमयजन्तदेवास्तानिधर्माणि प्रथमान्यासन् ।**
**तेहनाकं महिमानः सचन्त यत्र पूर्वेसाध्याः सन्ति देवः ।।**

**अर्थ** – देवांनी यज्ञद्वाराच यज्ञस्वरूप प्रजापतीचे पूजन केले. तीच कृत्ये जगदुद्धार करणारी, जगाच्या वाढीला कारण झाली. ज्या ठिकाणी जगाच्या उत्पत्तीला साधक असणारे देव असतात, ते स्वर्गरूपी स्थान त्यांची उपासना

करणाऱ्यांना प्राप्त होते. यानंतर पुढील प्रार्थना म्हणावी -

**ॐ राजधिराजाय प्रसह्यसाहिने ।**
**नमो वयं वैश्रवणाय कुर्महे ।**
**स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणोददातु ।**
**कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः ।**
**ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं,**
**पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं**
**समंतपर्याईस्यात् सार्वभौमः सार्वायुष**
**आंतादापरार्धात् पृथिव्यै समुद्रपर्यंताया एकराळिति। तदप्येष**
**श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरूत्तस्यावसन् गृहे ।**
**आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।**

**अर्थ** – राजाधिराज वैश्रवण यास आम्ही नम्रपणे नमस्कार करतो. मी ज्या कामना करतो त्या तो वैश्रवण कामेश्वर देवो. त्या कुबेर, वैश्रवण महाराजाला माझा नमस्कार !

आम्हाला सुख होवो. आमचे साम्राज्य भूमीवरील सर्व भोगांची प्राप्ती करून देणारे, आमचे स्वतःचे राज्य व्यापक परमेश्वराच्या राज्याच्या तोडीचे असो. ते सर्व भूमीवर, सीमा ओलांडून समुद्रापर्यंत सर्वत्र पसरणारे एकछत्री राज्य चिरकाल टिकणारे असो आणि आम्हीही दीर्घायुषी होवो !

आविक्षिताचा मरूत एवढा भाग्यवान होता, की त्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी देव त्याच्या सभेत त्याच्या भोवती सभासद म्हणून बसत असत !

ह्याप्रमाणे मंत्र पुष्पांजलीचे मंत्र म्हणून झाल्यावर स्वतः पूजकाने व तेथे उपस्थित असलेल्या सश्रद्ध भाविकांनी देवावर उजव्या हाताने फुले वहावीत व साष्टांग नमस्कार घालावा.

यावेळी ज्या देवतेची पूजा असेल तिचा गायत्री मंत्र म्हणण्याचा प्रघात आहे.



उदा.

सूर्यासाठी

ॐ भास्कराय विद्महे महातेजाय धीमहि।
तन्नो सूर्यः प्रचोदयात्।

गणेशासाठी

ॐ एकदन्ताय विद्महे। वक्रतुण्डाय धीमहि।
तन्नो दन्ती प्रचोदयात्॥

देवीसाठी

ॐ देव्यै ब्रह्माण्ये विद्महे महाशक्त्यै च धीमहि।
तन्नो देवी प्रचोदयात्॥

शिवासाठी

ॐ तत्पुरूषाय विद्महे। महादेवाय धीमहि।
तन्नो रूद्रः प्रचोदयात्॥

विष्णूसाठी

ॐ विष्णवेच विद्महे वासुदेवाय धीमहि।
तन्नो विष्णुः प्रचोदयात्॥

अशा प्रकारे षोडशोपचार पूजा पूर्ण झाली. त्यानंतर क्षमा प्रार्थना म्हणावी. ती अशी –

**आवाहनं न जानामि न जानामि विर्सजनम् ।**
**पूजां चैव न जानामि क्षम्यतां परमेश्वर ।।१ ।।**
**मंत्र हीनं क्रियाहीनं भक्तिहिनं सुरेश्वर ।**
**यत्पूजितं मया देव परिपूर्णं तदस्तु मे ।।२ ।।**
**गतं पापं गतं दु:खं गतं दारिद्रयमेव च ।**
**आगता सुखसंपत्ति: पुण्योऽहं तव दर्शनात् ।।३ ।।**
**अन्यथा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम ।**
**तस्मात्कारूण्य भावेन रक्ष रक्ष परमेश्वर ।।४ ।।**
**अपराधसहस्राणि क्रियंतेऽहर्निशं मया ।**
**दासोऽयमिती मां मत्वा क्षमस्व परमेश्वर ।।५ ।।**
**क्षमस्व परमेश्वर । क्षमस्व परमेश्वर ।।**

**भावार्थ** – मला आवाहन, विसर्जन वगैरे पूजेचे उपचार ठाऊक नाहीत. तसेच मला मंत्र, क्रिया, भक्ती, यांचेही ज्ञान नाही. तरीही मी केलेली पूजा पूर्ण करून घे. तुझ्या दर्शनाने पाप, दु:ख, दारिद्र्य नष्ट होऊन सुखसंपत्तीची प्राप्ती होते. हे देवा, मी तुला शरण आलो असून माझे तू रक्षण कर. माझ्या हातून सहस्रावधी अपराध नित्यश: घडत आहेत. तथापि या तुझ्या दासाला तू क्षमा कर.

यानंतर देवांना घातलेल्या स्नानाचे पाणी तीर्थ म्हणून घ्यावे.

यावेळी पुढील श्लोक म्हणावेत.

**अकालमृत्यूहरणं सर्वव्याधिविनाशनम् ।**
**विष्णुपादोदकं तीर्थं जठरे धाराम्यहम् ।।**
**अच्युतानंत गोविंद नामोच्चारणभेषजात् ।**

**नश्यंति सकलां रोगाः सत्यं सत्यं वदाम्यहम् ।।**
**शंखमध्ये स्थितं तोयं भ्रामितं केशवोपरि ।**
**अंगलग्नं मनुष्याणां ब्रह्महत्यां व्यपोहति ।।**

असे म्हणून शंखातील पाणी तीर्थ म्हणून उजव्या हातावर पळीभर घेऊन प्यावे. तीनदा तीर्थ घेऊन मग डोळ्यांना लावण्याची व ओला हात मस्तकावर लावण्याची प्रथा आहे.

## पूजा समाप्ती

यानंतर पुढीलप्रमाणे म्हणावे -

**अनेन यथाज्ञानेन यथा मीलितोपचारद्रव्यैः ध्यानावाहनादि**
**षोडशोपचारे (पंचोपचारे) पूजाराधनेन भगवान्**
**(श्रीमहाविष्णु - प्रमुख पंचायतन देवताः)**
**(इष्टदेवताः) प्रीयन्ताम - न मम् ।**
**प्रमादात्कुर्वतां कर्म प्रच्यवेताध्वरेषु यत् ।**
**स्मरणादेव तद्विष्णोः संपूर्णं स्यादिति श्रुतिः ।**
**ॐ तत्सद् ब्रह्मार्पणमस्तु ।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।**
**विष्णवे नमो ।। विष्णवे नमो ।। विष्णवे नमः ।।**

अशा प्रकारे षोडोपचार देवपूजा पूर्ण झाली.

◆◆◆



# हे लक्षात ठेवा



१) कोणत्याही दैवताच्या मूर्तीची प्रथम प्राणप्रतिष्ठा करावी व नंतरच ती पूजेत ठेवावी. कारण प्राणप्रतिष्ठा केल्यानंतरच मूर्तीला देवत्व प्राप्त होते.

२) देवाला एक प्रदक्षिणा कधीही घालू नये. किमान तीन घालाव्यात.

३) एकाच देवाच्या अनेक मूर्ती पूजेत ठेवू नयेत.

४) शिवनगरीतून सोमवारी परगावी जाण्यास निघू नये.

५) बेल ताजा न मिळाल्यास शिळा चालतो. परंतु सोमवारचा बेल दुसऱ्या दिवशी चालत नाही.

६) जल कमळावाचून अन्य फुलांच्या कळ्यांनी देवाची पूजा कधीही करू नये.

७) द्वादशीस तुळस तोडू नये व रविवारी दुर्वा तोडू नये.
८) निरांजनात तूप व तेल एकत्र कधीही घालू नये.
९) धूप हाताने न पसरता पंख्याने पसरावा.
१०) देवापुढील समई केव्हाही फुंकून विझवू नये.
११) एकाच काडीने तीन दिवे लावू नयेत.
१२) देव व गुरू यांना वंदन करताना ते डोक्यावरील टोपी काढूनच करावे.
१३) स्त्रियांनी तुळस केव्हाही तोडू नये.
१४) भस्माचा त्रिपुंडू लावल्यावाचून व गळ्यात रुद्राक्षांची माळ घातल्यावाचून महादेवाची पूजा कधीही करू नये.
१५) देवापुढे नारळ वाढविताना शेण्डीचा भाग देवाकडे करावा.
१६) देवघरात देवांची तोण्डे समोरासमोरा येतील अशाप्रकारे देव ठेवू नयेत.
१७) देवदेवतांच्या मूर्तींची व तसबिरींची तोंडे दक्षिण दिशेकडे असू नयेत.
१८) संकल्प सोडल्याशिवाय कोणतेही धार्मिक कृत्य करू नये.
१९) देवास अर्पण केलेले एकच वस्त्र त्यावर पाणी शिंपडून देवासाठी पुन्हा वापरण्यास हरकत नाही.
२०) भगवान् विष्णूच्या मस्तकावर वाहिलेले फूल मनुष्याने स्वत:च्या मस्तकावर कधीही ठेवू नये. तसेच, डाव्या हाताने देवावर काहीही वाहू नये.
२१) नवार्णव आणि गायत्री हे मंत्र स्नानोत्तर आसनावर बसूनच जपावेत. रस्त्यातून जाताना वगैरे जपू नयेत.
२२) पोथी ही पवित्र वस्तू असल्याने तिची पाने उलटताना कधीही बोटाला थुंकी लावू नये.
२३) पूजा करण्यापूर्वी कधीही जेवण करू नये.
२४) घरातील देवमूर्तीवर अस्पर्श स्त्रीची (विटाळशीची) छाया पडणार नाही याची काळजी घ्यावी तशी छाया पडल्यास घरात अशांती

माजते.

२५) देवपूजेची खोली वेगळी नसेल तर अशा काळात देवाघरावर शाल टाकून ठेवावी, म्हणजे छाया पडणार नाही. तसेच घरातील देवघरावर कधीही कळस नसावा.

२६) भस्मलेपन व कपाळी गंध वा कुंकुम तिलक लावल्यावाचून कधीही देवपूजा करू नये.

२७) गृहस्थाश्रमी व्यक्तीने ओलेत्याने देवपूजा करू नये. अशी पूजा फक्त संन्याशालाच करता येते.

२८) देवाला कधीही एका हाताने नमस्कार करू नये. तसेच, पायात बूट चपला घालूनही नमस्कार करू नये. नमस्कार करताना तो किंचित वाकून विनम्र भावाने करावा.

२९) शाळिग्रामाला अक्षता वाहू नयेत व गणपतीला तुळस वाहू नये. (अपवाद फक्त गणेश चतुर्थी)

३०) आपली जपमाला तसेच आसन कधीही दुसऱ्यास वापरण्यासाठी देऊ नये.

३१) देवाकडे पाय करून कधीही झोपू नये.

३२) देवावर वाहिलेली वस्त्रे, उपरणे इ. अधूनमधून स्वच्छ धुवावीत.

३३) शंकराला कुंद व केतकी, विष्णूला धोत्रा, देवीला मंदार व सूर्याला तगर ही फुले वर्ज्य आहेत.

३४) एकाच मूर्तीची पूजा करू नये. मूर्ती नेहमी एकापेक्षा अधिक असाव्यात.

३५) स्वत:ला गंध लावताना ते नेहमी मधल्या बोटाने लावावे.

३६) जानवे नाभीपर्यंत (बेंबीपर्यंत) येईल इतकेच लांब असावे. मलमूत्रोत्सर्गाचे वेळा ते आठवणीने कानावर अडकवावे.

३७) नैवेद्याच्या ताटात मीठ कधीही असू नये.

३८) नित्य पूजेत कलशातील पाण्यात तुलसीपत्र घालण्यास विसरू नये.

३९) डाव्या हाताने देवाला फूल वगैरे कधीही वाहू नये.

४०) आजारपणात स्नान करता येत नाही. अशावेळी स्वत: पूजा न करता दुसऱ्याने केलेली पूजा पाहिली तरी चालते. किंवा डोळे मिटून मानसपूजा करावी.

४१) घरात पूजावयाची मूर्ती एका वितीपेक्षा जास्त उंचीची असू नये. तसेच ती अंगठ्याच्या पेरापेक्षा लहानही असू नये.

४२) देव व गुरू यांना वंदन करताना डोक्यावरील टोपी हातात काढून मगच वंदन करावे.

४३) उपासना मार्गात ज्याला खरोखरच काही मिळवायचे असेल त्याने नेहमी सत्य बोलावे व कधीही परान्न घेऊ नये.

४४) बसलेला मारुती व उभा गणपती पूजेत शक्यतो ठेवू नये, असे धर्मशास्त्र सांगते.

४५) वैधृती, व्यतिपात तसेच मंगळवार, शुक्रवार, रविवार, पौर्णिमा, अमावस्या, संक्रांति, द्वादशी, जननाशौच व मृताशौच या वेळी तुलसीपत्रे कधीही तोडू नयेत.

४६) यज्ञोपवीत ही एक अत्यंत पवित्र वस्तू असून यज्ञोपवीत धारण केल्यास शरीराचे रक्षण होते. म्हणूनच यज्ञोपवीताचा उपयोग किल्ली अडकविण्यासाठी वगैरे कधीही करू नये. मूत्रोत्सर्ग करताना तसेच शौच्याचे वेळी ते कानावर ठेवावे.

४७) गंध कधीही आज्ञाचक्रावर (दोन भुवयांच्या मध्ये) लावू नये. कारण तसे केल्यास आज्ञाचक्राच्या ठिकाणी सुप्तावस्थेत असलेला तृतीय नेत्र बंद होतो. म्हणूनच गंध आज्ञाचक्राचे वरच्या भागात लावावे.

४८) नैवेद्य नेहमी देवाच्या उजव्या हाताला ठेवावा. डाव्या हाताला ठेवलेला नैवेद्य अभक्ष्य बनतो. नैवेद्य ठेवण्यापूर्वी त्याच्या खाली पाण्याने

चौकोन काढावा. तसेच, तुलसीपत्र, दुर्वा किंवा पुष्प यांनी त्यावर प्रोक्षण करावे.

४९) देवपूजा झाल्यावर डोळे बंद करून थोडावेळ तरी बाहेरच्या देवाला आत - हृदयात - पाहण्याचा प्रयत्न करावा.

५०) देवासमोर पाठ करून कधीही बसू नये.

५१) स्नान न करताच तसेच तंबाखू, पान चघळत देवपूजा कधीही करू नये.

५२) इतरांशी गप्पाष्टके झोडीत देवपूजा करू नये. आपले मन पूर्णत: देवाकडेच असावे.

५३) देवासमोर बसून धूम्रपान करू नये.

५४) पायात जोडे घालून देवाचे दर्शन घेणे,
डोक्यावर टोपी घालून देवाला नमस्कार करणे,
देवाला एका हाताने प्रणाम करणे,
देवाकडे न पाहता प्रदक्षिणा घालणे,
देवाकडे पाय करून झोपणे.
हे ‘सेवापराध’ असून खऱ्या साधकाने ते कधीही करू नयेत.

◆◆◆



# देवपूजा - शंका समाधान



**१) पंचामृतात कोणकोणत्या गोष्टींचा समावेश होतो ?**

पंचामृतात १) दूध २) दही, ३) साजूक तूप ४) मध आणि ५) साखर या पाच वस्तू असतात.

**२) देवाचे तीर्थ घेताना कोणता मंत्र किंवा श्लोक म्हणतात ?**

हा श्लोक असा—

**अकाल मृत्युहरणं सर्वव्याधिविनाशनम् ।**
**विष्णुपादोदकं तीर्थं जठरे ध्यारयाम्यहम् ।।**
**शरीरे जर्जरी भूते व्याधिग्रस्ते कलेवरे ।**
**औषधं जान्हवी तोयं वेद्यो नारायणो हरिः ।।**

**३) देवासमोरील समईची ज्योत कोणत्या दिशेला असावी ?**

दक्षिण दिशा सोडून इतर कोणत्याही दिशेला चालेल.

**४) देवापुढे श्रीफळ ठेवताना शेण्डी कोणत्या बाजूला असावी ?**

श्रीफळाची शेण्डी नेहमी देवाकडे तोंड करूनच असावी.

**५) देवाला गंध कोणत्या बोटाने लावावे ?**

देवाला करांगुली शेजारच्या बोटानेच नेहमी गंध लावावे.

**६) देवापुढील समईत किती वाती असाव्यात ?**

देवापुढील समईत नेहमी १, ३, ५, ७ अशा विषम संख्येतच वाती असाव्यात. सम संख्येत वाती लावू नयेत.

**७) देवाची स्तोत्रे मनात म्हणावीत की मोठ्याने ? तसेच जप कसा करावा ?**

देवाची स्तोत्रे कधीही मनात म्हणू नयेत. ती खड्या आवाजातच म्हणावीत. जप सुरुवातीला थोडे दिवस मोठ्याने केला तरी चालेल नंतर मात्र मनातच करावा. पोथीवाचन व आरत्याही मोठ्यानेच म्हणणे आवश्यक आहे.

मात्र आरत्या म्हणताना शेजाऱ्यांना त्रास होईल इतक्या मोठ्याने झांजा वैगरे वाजवू नये.

**८) पंचगव्यात कोणकोणत्या वस्तूंचा समावेश असतो ? पंचगव्याचा उपयोग कोणता ? पंचगव्य घेताना कोणता श्लोक म्हणतात ?**

पंचगव्यातील सर्वच पदार्थ गाईपासूनच मिळतात. यामध्ये गाईचे मूत्र, शेण, दूध, दही व तूप यांचा समावेश असतो. पंचगव्य प्याल्याने शरीराची शुद्धी होते. यासाठीच पंचगव्य नित्यनेमाने किंवा जेव्हा मिळेल तेव्हा अवश्य प्यावे. निदान श्रावणीच्या वेळी तसेच, सोयर सुतक संपल्यावर व चंद्र सूर्य ग्रहणानंतर तरी जरूर प्यावे. ते पिताना पुढील श्लोक म्हणावा–

**यत्वगस्थि गतं पापं देहे तिष्ठति मामके ।**
**प्राशनात्पंचगव्यस्य दहत्यग्निरि वैधनम् ॥**

**९) श्रीगणेशाला २१ दूर्वा वाहताना गणेशाची कोणती नावे म्हणण्याची पद्धती आहे ?**

प्रथम २१ दुर्वा स्वच्छ धुवून त्यांना गंध लावून त्यावर अक्षता ठेवाव्यात नंतर पुढील एकेक नाव उच्चारीत २, २ दुर्वा वाहाव्यात

**ॐ गणाधिपाय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ उमापुत्राय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ अघनाशनाय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ विनायकाय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ ईशपुत्राय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ सर्वसिद्धिप्रदायकाय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ एकदन्ताय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ इभवक्त्राय नमः दुर्वायुग्मं समर्पयामि । ॐ आखुवाहनाय नमः दुर्वा युग्मं समर्पयामि । ॐ कुमारगुरवे नमः दुर्वायुग्मं समर्पयामि ।**

अशा २० दुर्वा अर्पण केल्यानंतर राहिलेली एक दुर्वा वाहताना पुढील श्लोक म्हणावा.

**गणाधिप नमस्तेऽस्तु उमापुत्राघनाशन । विनायकेशपुत्रेति सर्वसिद्धिप्रदायक ॥ एकदन्तेभवक्त्रेति तथा मूषकवाहन । कुमार गुरवे नित्यं पूजनीयाः प्रयत्नतः ॥ श्रीसिद्धिविनायकाय नमः दुर्वामेकां समर्पयामि ॥**

व नंतर ती दुर्वा श्रीगणेशाला अर्पण करावी.

**१०) कृष्ण व विष्णूच्या पूजेत तुळशीला एवढे महत्त्व का ? तुळशीपेक्षा श्रेष्ठ काय ?**

गौतमी तंत्रात तुळशीदलाचे महात्म्य वर्णन केलेले आढळते. त्यात असे म्हटले आहे की, सर्व फुलांपेक्षा नील किंवा लाल कमळ हजार पटीने

श्रेष्ठ आहे. परंतु त्यापेक्षाही तुळशीपत्र अधिक श्रेष्ठ आहे. **तुळशीपेक्षाही तुळशीची मंजिरी अधिक श्रेष्ठ आहे.** या तंत्रात पुढे असेही म्हटलेले आहे की, तुळसीदल किंवा मंजिरी न मिळाली तर तेथील मृत्तिकाही कृष्णाला वा विष्णूला वाहावी.

**११) निर्माल्याचे काय करावे ?**

वरील प्रश्न सध्याच्या काळात अनेकांना पडतो. कारण पुष्कळ शहरातून वाहत्या नद्या बारा महिने आढळत नाहीत. तर काही शहरात नद्यातून निर्माल्य वगैरे टाकण्यास कायद्यानेच बंदी आहे. मग अशावेळी काय करावे ? जी मंडळी समुद्राकाठी राहतात त्यांनी तो समुद्रात टाकावा (त्यालाही काही ठिकाणी बंदी आहे) नदीत सोडणे शक्य नसेल तर तो बागेत पुरून टाकण्यास हरकत नाही. परंतु तो कचरापेटीत कधीही टाकू नये.

**१२) देवपूजेसाठी लागणारे गंध स्नानापूर्वी उगाळले तर चालेल का ? ते कसे उगाळावे ?**

नाही. कारण स्नानापूर्वी शरीर स्वच्छ व पवित्र नसते. आणि देवाला तर प्रत्येक गोष्ट शुद्ध स्वच्छ व पवित्रच लागते. म्हणून स्नानापूर्वी गंध उगाळत नाहीत. ते उगाळण्यापूर्वी हात स्वच्छ धुवावेत. व शक्यतर न बोलता ते उगाळावे.

तसेच गंध उगाळताना ते डावीकडून उजवीकडे असे उगाळावे. औषध उगाळतात तसे उगाळू नये. तसेच सहाणेवरून सरळ तसेच देवांना न लावता तबकडीत भरून मगच लावावे. विष्णूला उभे, शिवाला आडवे लावावे. इतर देवांना गंधाचा घट्ट टिळा लावावा.

**१३) एकादशी व्रताचा संकल्प कोणता ? हे व्रत कसे करावे ? ते सोडताना काय करावे ?**

एकादशी व्रत हे आपल्याला इंद्रिय निग्रहाची सवय व्हावी यासाठी

आहे. या दिवशी असत्य भाषण, मैथुन, अतीजलपान इ. गोष्टी वर्ज्य कराव्यात. यासाठी मनाचा निग्रह आवश्यक असतो. या दिवशी "मम कायिक वाचिक मानस सांसर्गिक पातकोपपातक दुरित क्षय पूर्वक श्रुतिस्मृति पुराणोक्त फल प्राप्त्यर्थे श्रीपरमेश्वर प्रीतिकामनया एकादशी व्रतमहं करिष्ये" असा संकल्प उच्चारून ताम्हनात पाणी सोडावे. आणि जितेंद्रीय होऊन श्रद्धाभक्तिपूर्वक व यथाविधी देवतांचे पूजन करावे. रात्री जागरण करून भगवान विष्णूचे स्मरण पूजन व भजन करावे. एकादशीस होम हवन करण्याची पद्धत नाही.

हे व्रत ऐंशीव्या वर्षांपर्यंत करावे. तथापि त्यापूर्वी शरीराला दुर्बलता आली तर व्रताचे उद्यापन करून त्याची समाप्ती करावी.

## १४) देवपूजेत दीपाचे एवढे महत्त्व का ?

दिवा हे तेजाचेच एक प्रसन्न रूप आहे. तो चतुर्विध पुरुषार्थ साधून देणारा आहे. असे त्याचे वर्णन कालिकापुराणात आढळते. म्हणून दिव्याच्या प्रकाशात देवाचे रूप न्याहाळावे व तिन्ही सांजेला देवाजवळ व तुळशीजवळ दीप लावावा. हा मंगलकारक मानला गेला आहे. म्हणूनच देवाप्रमाणेच, वधुवरांना, तसेच बाळ बाळंतिणीला दीपाने ओवाळण्याची पद्धत आहे. कोणत्याही मंगलविधीत साक्षी म्हणून दीप प्रज्वलित करून ठेवतात. तर नवरात्रात नऊ दिवस दीप अखंड तेवत ठेवण्याची पद्धत आहे.

देवापुढे लावावयाच्या दिव्यात तेल किंवा तूप याशिवाय अन्य कोणतेही ज्वलनद्रव्य वापरू नये, असे अग्निपुराणात सांगितले आहे.

हा दिवा जमिनीवर ठेवू नये. तसेच तो फुंकर मारून विझवू नये. तो फुलाने विझविण्यास हरकत नाही. आषाढी अमावास्या ही दिव्याचीच आवस असते. यादिवशी दिव्यांची पूजा करतात.

**१५) पूजेत घण्टा केव्हा वाजवितात ?**

ही एकंदर चार वेळा वाजविली जाते. (१) देवाच्या स्नानाचे वेळी, (२) धूप दाखविताना (३) दीप ओवाळताना व (४) देवाची आरती करताना.

**१६) घरात एखादी स्त्री अस्पर्श (विटाळशी) असेल तर घरात पूजा करावी का ?**

घरात एकच खोली असेल तर अशा वेळी देवपूजा न करणेच उत्तम. त्यावेळी (४ दिवस) देवघरावर शाल किंवा कापड घालून देवघर झाकून ठेवणे उत्तम. मात्र, एकापेक्षा अनेक खोल्या असतील व देवघराच्या खोलीत अस्पर्श स्त्रीचा वावर नसेल तर घरातील कर्त्या माणसाने देवपूजा करण्यास हरकत नाही.

**१७) पूजेनंतर देवदेवतांना कुंकू का वाहतात ?**

आमच्याकडे अशी श्रद्धा आहे की पुरुष देवाबरोबर त्याची पत्नीही (शक्ती) असते. यासाठीच असे कुंकू वाहिले जाते.

**१८) देवपूजेत घण्टावादनाचे महत्त्व काय ? ती कधी वाजवावी ?**

घण्टावादनामुळे सर्व वाद्ये वाजविल्याचे श्रेय मिळते म्हणून देवपूजेत घण्टा वाजवितात.

**१९) बसलेला मारुती आणि उभा गणपती पूजेत ठेवावेत का ?**

धर्मशास्त्रानुसार बसलेला मारुती व उभा गणपती पूजेत ठेवू नयेत. मात्र, यामागचे नेमके कारण शास्त्रात सांगितलेले नाही. तरी ते असे असू शकेल की, मारुती हे शक्तीचे प्रतीक आहे. रामकार्यासाठी व भक्तांची संकटे दूर करण्यासाठी तो हातात गदा घेऊन सदासर्वकाळ उभाच राहिलेला योग्य नव्हे का ? त्याला बसवून ठेवले तर तो हे कार्य कसे करणार ?

तसेच गणेश हे मांगल्याचे प्रतीक आहे. अधिष्ठान घरात कायम राहावे

यासाठी त्याने घरात (म्हणजेच देवघरात) बसून राहणेच योग्य होईल.

### २०) सिद्धिविनायकाचे वैशिष्ट्य काय ?

काही गणेशमूर्तींची सोण्ड डावीकडे वळलेली तर काहींची उजवीकडे वळलेली असते. यापैकी उजवी सोण्ड असलेल्या गणेशाला सिद्धिविनायक असे नाव आहे. याच्या उजव्या व डाव्याबाजूला ऋद्धीसिद्धी असतात. हा सिद्धीविनायक पापकर्माचे फल त्वरित देतो असे म्हणतात. यासाठीच सिद्धीविनायकाच्या उपासकाने पाप कर्मापासून सदैव दूर राहावे.

तसेच, सिद्धिविनायकाकडे फक्त मोक्ष मागावा, व्यावहारिक गोष्टींची मागणी त्याच्याजवळ करू नये. त्या डाव्या सोण्डेच्या मूर्तीजवळ मागाव्यात. व्यवहारातही आपण डावे उजवे असा शब्दप्रयोग वापरतो. डाव्या गोष्टी कमी दर्जाच्या असतात, तर उजव्या गोष्टींचा दर्जा उत्तम असतो. सांसारिक गोष्टी म्हणजेच डाव्या गोष्टी व मोक्ष म्हणजेच उजवी गोष्ट.

### २१) उजव्या सोण्डेच्या मूर्तीची पूजा करताना कोणते नियम पाळावेत ?

उजव्या सोण्डेच्या गणपतीला रोज श्री गणेश अथर्वशीर्षाने अभिषेक करणे आवश्यक आहे. तसेच त्याला रोज शेंदूर व तांबडे फूल वाहणेही जरुरीचे आहे. या गणपतीजवळ कोणतीही व्यावहारिक मागणी करून नये. कारण तो फक्त 'मोक्ष' देतो. तसेच त्याची पूजा सोवळ्यानेच केली पाहिजे.

### २२) देवांच्या मूर्तीप्रमाणेच तसबिरींचीही प्राणप्रतिष्ठा करतात का ?

नाही. प्राणप्रतिष्ठा फक्त देवमूर्तींची केली जाते. तसबीर हे केवळ देवाचे प्रतीक आहे. अर्थात् तिची पूजाही कमी महत्त्वाची नाही. मात्र, तसबिरीवर अभिषेक करता येत नसल्याने श्रीगणेश, शिव अशा दैवतांच्या शक्यतर मूर्तीच ठेवाव्यात.

**२३) सोयर / सुतक (अशौच) असताना पूजा कशी करावी ?**

अशावेळी गुरुजींकडून पूजा करून घ्यावी. कारण त्यांना अशौच नसते.

**२४) अखण्ड नंदादीप मध्येच मालवला गेला तर ती भावी संकटाची सूचना समजावी का ?**

मुळीच नाही. अशावेळी मनाला लावून घेऊ नये. वाऱ्याचा झोत आल्यास दिवा विझणे नैसर्गिकच आहे.

**२५) देवपूजेत श्रीयंत्र, दत्तयंत्र इ. यंत्रांची पूजा करावी का ?**

अवश्य करावी. कारण यंत्रात त्या त्या देवतेचे अधिष्ठान असते. मंत्रांमध्ये गूढ असलेल्या देवता यंत्राच्या द्वारेच प्रकट होतात. मात्र यंत्रे पूजनात ठेवण्यापूर्वी त्यांची जाणत्याकडून प्राणप्रतिष्ठा करून घेणे आवश्यक आहे. यंत्राचे वजन १ ते ७ तोळे इतके असावे. यंत्रे, तांबे, रुपे, सुवर्ण व स्फटिक इ. वर कोरलेली असतात. रुद्रयामल ग्रंथात प्रवाळ, पद्मराग, नीलमणी, वैडुर्य, स्फटिक व पोवळे या रत्नांवरही कोरली जातात.

**२६) साधकाने कांदा लसूण न खाण्यामागे कोणता हेतू आहे ?**

कांदा लसूण इ. पदार्थ हे तामसी गुणांनी युक्त असून ते खाल्ल्यामुळे मन व शरीरही तामसी बनते. उपासनेला तर सात्विक शरीर व मन आवश्यक असते. यासाठीच कांदा, लसूण हे तामसी पदार्थ उपवासाला वर्ज्य सांगितले आहेत.

**२७) मंदिरात देवासमोर नारळ का फोडतात ?**

देवासमोर नारळ फोडण्यामागे बलिदानाचा भाव आहे. प्राचीन काळी देवासमोर मनुष्य किंवा पशूचा बळी देण्यात येत असे. ही गोष्ट भारतीय संस्कृतीत बसत नसल्याने ज्ञानी ऋषींनी यातूनही एक मार्ग शोधून काढला. त्यांनी विश्वामित्राच्या प्रतिसृष्टीतील नर म्हणजे नारळ ह्याने बलिदान लोकांचा

सुचविले. कारण नारळालाही डोके, शेंडी, नाक, डोळे इ. आहेत. परंतु बलिदानाच्या वेळी रक्ताचा शिडकावा झाला पाहिजे. म्हणून ऋषींनी देवाच्या मूर्तीला सिंदूर (कुंकू) लावायला व त्यावर नारळाच्या पाण्याचा शिडकावा करण्यास सांगितले. त्यामुळे रक्ताचा लाल रंगही येईल. अशा प्रकारे ऋषींनी मानवाला नर आणि पशुहत्येपासून वाचविले. शिवाय, नारळ हे बाराही महिने सहज मिळणारे फळ असून ते दीर्घकाळ टिकणारेही आहे.

**२८) शिवपूजा करताना कोणते महत्त्वाचे नियम पाळावेत ?**

शिवाला कधीही तुळस वाहू नये. फक्त शालिग्रामावर वाहिलेली तुळस शिवाला चालते. तसेच शिवतीर्थ पिऊ नये. मात्र स्वयंभू बाणलिंगावरील तीर्थ पिण्यास ग्राह्य आहे. शिवपूजा झाल्यावर निरांजन ओवाळून होताच लगेच वेळ न दवडता नैवेद्य दाखवावा लागतो. शिवपूजेत केवड्याचा वापर करू नये. तसेच, शंखाचे पाणी शिवाला वाहू नये. असे बरेच नियम आहेत परंतु महत्त्वाचे तेवढे वर दिले आहेत.

**२९) निरांजन वा समईतील वात विझल्यावर काय करतात ?**

अशी वात विझल्यावर तीवर दुधाचा थेंब टाकावा. ते शक्य नसल्यास निरांजन वा समई झाकून ठेवावी. निरांजन पूर्ण विझल्यावर पालथे घालावे.

**३०) हिंदुधर्मात हजारे देवदेवता आहेत. मग आपण नेमकी कोणत्या देवतेची उपासना करावी ?**

यात कुलदैवताचा समावेश प्रामुख्याने करावा. इतर देवतांमध्ये ज्या दैवताविषयी तुमच्या मनात भक्तिभाव असेल अशा दैवताच्या मूर्तीची उपासना, पूजा करावी. दुसरा अमूक देवतेला भजतो म्हणून आपणही त्याच दैवताला भजणे योग्य होणार नाही. एखाद्या सत्पात्र व्यक्तीकडून अनुग्रह घेतला असल्यास त्याचीही सद्‌गुरू म्हणून रोज पूजा करावी.

### ३१) प्रवासात देवपूजा कशी करावी ? प्रवासात स्तोत्र पठण केले तर चालते का ?

प्रवासात मानसपूजा करणे हा सर्वांत प्रशस्त मार्ग आहे. ही पूजा आगगाडीच्या डब्यात बसूनही डोळे मिटून मनातल्या मनात करता येते. प्रवासात स्तोत्र पठण करण्यास काहीच हरकत नाही. काही वेळा काळवेळ पाहून ते मोठ्याने न करता मनात एकाग्रपणे करावे. पोथीवाचन मात्र गाडीत शक्यतर टाळणेच बरे.

### ३२) देवपूजा किंवा साधना करताना मन एकाग्र न होण्याची कारणे कोणती ? त्यासाठी काय करावे ?

मन हे तुम्ही जे अन्न खाता त्यानुसार घडत असते. तुम्ही सात्विक आहार घेत असाल तर मन शुद्ध व सात्विक बनते आणि असे शुद्ध मन लवकर एकाग्र होऊ शकते. याउलट मांसाहार व सुरापान करणाऱ्यांचे मन एकाग्र होणे कठीण जाते. यासाठी खऱ्या उपासकाने आहारावर कडक बंधने घालून घ्यावीत. शक्यतर परान्नही वर्ज्य करावे. कारण पुष्कळदा ते आरोग्यासही घातक असते.

### ३३) देवातील शंखाबाबत व शंखस्नानाबाबत कोणते नियम आहेत ?

देवपूजेत घंटेप्रमाणेच शंख असणेही अत्यंत आवश्यक आहे. देवाच्या अंगावर समर्पण करावयाचे शंखोदक रात्रभर शंखात ठेवलेले असावे. त्यात औषधी गुण असतात. शंखोदकाने देवाला स्नान घालताना तो शंख पात्रात बुडवून कधीही स्नान घालू नये असा शास्त्रदंडक आहे. कारण असे पाणी सुरेप्रमाणे (दारूप्रमाणे) ठरते. यासाठीच शंखावर वरून पाणी घालून तो पाण्याने भरावा. महादेवाच्या पिंडीवर कधीही शंखोदक घालू नये. एकाच देवघरात दोन शंखही ठेवू नयेत. शंखावर अक्षता वाहण्याचीही पद्धत नाही. त्याला गंध लावून त्यावर तुलसीपत्र वाहावे.

### ३४) तुळस, बेल, दुर्वा इ. पत्री केव्हा तोडाव्यात ?

श्रीगणेशाला दुर्वा, विष्णूला तुळस, शिवाला बेल फार प्रिय आहे. मात्र, या पत्री अष्टमी अमावस्या, पौर्णिमा, तसेच त्या त्या दैवतांच्या तिथी वारांना तोडू नयेत. (उदा. सोमवारी बेल तोडू नये) तर शुक्रवार, रविवार, एकादशी, अमावस्या, पौर्णिमा, संक्रांती व अशौच कालात तुलसी तोडू नयेत. परंतु फारच आवश्यक असेल तर त्या त्या वृक्ष देवतेची क्षमा मागून तोडाव्यात असा शास्त्रसंकेत आहे.

### ३५) तुळशी, रुद्राक्ष इ. ची माळ गळ्यात का घालतात ? तिचे कोणते फायदे आहेत ?

जे उपांशू जप करतात त्यांच्या कंठातील शिरांना जास्त परिश्रम होतात व परिणामी त्यांना गालगुंड, गंडमाळा यासारखे त्रास होऊ शकतात. या रोगांपासून वाचण्यासाठी तुळशी, रुद्राक्ष इ. च्या माळा गळ्यात घातल्या जातात. रुद्राक्ष माळेमुळे अधिक रक्तदाबावरही नियंत्रण ठेवले जाते असे म्हणतात व काहींचा तसा अनुभव आहे. कारण, तुळशी व रुद्राक्ष या दिव्य औषधी आहेत.

काही मुलांना दात येताना त्रास होतो. अशा वेळी या माळा त्यांच्या गळ्यात घातल्यास त्रासाचे प्रमाण बरेच कमी होते.

### ३६) जप करताना जपमाळच का वापरायची ? घड्याळाच्या वेळेवर जपसंख्येची मोजदाद करता येणार नाही का ?

शास्त्र असे सांगते की दर्भाशिवाय धर्मानुष्ठान, उदक स्पर्शाशिवाय दान व जपमाळेशिवाय न मोजता केलेला जप ही सर्व निष्फळ आहेत.

जपमाळेवर जप केल्यास पुढील फायदे होतात. (१) माळेमुळे जप किती झाला ते बरोबर कळते. (२) माळ ही रुद्राक्ष, तुळस यासारख्या पवित्र वस्तूंची बनविलेली असल्याने त्या पवित्र वस्तूंचे सान्निध्य आपणास सहजपणे

लाभते. (३) अंगठा व बोटे यांच्या घर्षणाने जी एक विलक्षण विद्युतशक्ती निर्माण होते ती शरिरातील नसांद्वारे हृदय प्रभावित करते व मनाची एकाग्रता वाढविते.

## ३७) पूजेला किंवा जपाला बसताना मृगाजिनावर बसायला का सांगितले आहे ?

मृगाजिनाचे महत्त्व युजुर्वेदात सांगितलेले आपल्याला आढळते. मृगाजिनामध्ये अशी शक्ती आहे की त्याच्या संपर्कामुळे बसणाऱ्याची कामेंद्रिये शांत होतात. म्हणूनच ब्रह्मचारी योगी, मुनी व महात्मे मृगाजिनावर बसतात. तर आयुर्वेद असे सांगतो की मृगाजिनावर बसल्याने मूळव्याध, भगंदर यासारख्या व्याधी बऱ्या होतात. मृगाजिन सात्विक विद्युतशक्तीने परिपूर्ण आहे. परंतु व्याघ्राजिन किंवा सिंहासन यात 'राजस' शक्ती आहे. म्हणून त्यांचेवर बसल्यावर शक्ती, पराक्रम व बल वाढते. यासाठीच भारतीय राजे राज्याभिषेकाच्या वेळी सिंहासनावर बसत. या आसनांजवळ साप, विंचू, डास व इतर विषारी कीटकही येत नाहीत.

## ३८) पूजा वगैरे करण्यापूर्वी भस्म कशासाठी लावायचे ? शास्त्र काय सांगते ?

शास्त्र असे सांगते की त्रिपुण्डावाचून केलेली पूजा, वेदाध्ययन, जप व दान ही सर्व व्यर्थ होत. यासाठीच गृहस्थाने तिन्ही काळी भस्मात पाणी घालून ते लावावे तर वानप्रस्थ, मुले व दीक्षाविरहित मनुष्याने माध्यान्हापूर्वी पाण्याने मिश्रित भस्म लावावे तर माध्यान्हानंतर ते पाण्यावाचून लावावे.

पवित्र रक्षेला भस्म म्हणतात. यासाठी हवनातील (अग्निकुंडातील) रक्षा सर्वात उत्तम. भस्म हे पापनाशक असून ब्रह्मविद्येच्या प्राप्तीसाठी फार उपयुक्त समजले जाते. भस्मधारणाने देह व मन यांची शुद्धी होते. ते लावताना 'ॐ नमः शिवाय' किंवा 'ॐ नमोनारायणाय' असे म्हणावे. अथवा गायत्री

मंत्राचा उच्चार करावा अशी शास्त्राज्ञा आहे.

भस्माचा त्रिपुण्ड आणि रुद्राक्षाची माळ धारण न करता केलेली शिवपूजा व्यर्थ होते. म्हणूनच भस्म मिळाले नाही तर मातीचा त्रिपुण्ड लावावा परंतु त्रिपुण्डाशिवाय राहू नये अशी शास्त्राज्ञा आहे. त्रिपुण्ड धारण करणाऱ्याची सर्व पापे नष्ट होतात व तो शिवाला प्रिय होतो.

**३९) हल्ली शहरातील लोकांना पूजेपूर्वी समुद्र, नदी, विहिरी वा तलावाच्या पाण्याने स्नान करता येत नाही. त्यांना त्यासाठी नळाचेच पाणी वापरावे लागते. या पाण्यातील दोष नष्ट करण्यासाठी काय करावे ?**

अशावेळी पुढील श्लोक म्हणत स्नान केले असता सर्व जलदोष दूर होतात. श्लोक असा-

**गंगेच यमुने चैव गोदावरि सरस्वती: ।**
**नर्मदे सिंधु कावेरी जले ऽस्मिन् सन्निधिंकुरू ।।**
**गंगाद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते ।**
**स्नात्वा च कनखले तीर्थे पुनर्जन्मा न विद्यते ।।**
**पापो ऽहं पापकर्मा ऽहं पापात्मा पापसंभवा ।**
**त्राहि मां कृपया गंगे सर्व पापहरा भव ।।**

**४०) पूजा किंवा इतर धार्मिक विधी करण्यापूर्वी संकल्प का आवश्यक आहे ?**

कारण संकल्पावाचून केलेले कृत्य निष्फल होते. या संदर्भात 'आचारेंदू' तील पुढील श्लोक पाहावा -

**संकल्प तथा कुर्यात् स्नानदानव्रतादिकम् ।**
**अन्यथा पुण्यकर्मादी निष्फलानि भवानीच ।।**

याचा अर्थ - संकल्प न करता स्नान, दान, व्रतादिक पुण्यकर्मे केली तर

त्यांचे फल मिळत नाही.

संकल्प म्हणजे एक प्रकारची प्रतिज्ञाच होय. संकल्प केल्याने त्या त्या कृत्यासाठी आवश्यक ती मनाची सिद्धता होते आणि सर्व इंद्रियवृत्ती त्या कृत्याकडे आपल्या सर्व सामर्थ्यानिशी धावून जातात.

### ४१) शुभप्रसंगी प्रथम कलशाची पूजा का केली जाते ?

कलश हे भारतीय संस्कृतीचे अग्रगण्य प्रतीक आहे. म्हणूनच सर्वच शुभ प्रसंगी प्रथम कलश पूजन केले जाते. देवपूजेपेक्षाही कलश पूजेला जास्त महत्त्व आहे. पहिले पूजन व पहिला नमस्कार कलशाला केला जातो. आमच्या ऋषींनी पाण्याच्या लहानशा कलशात सर्व देव, वेद, समुद्र, नद्या, गायत्री, सावित्री वगैरेंची स्थापना करून फार मोठे औचित्य साधले आहे. त्यांनी बिंदूत सिंधूचे दर्शन घडविले. आमची भारतीय संस्कृती अशी महान आहे.

### ४२) या कलशात कोणत्या वस्तू टाकतात ? तो कशावर स्थापन करतात ?

कलश हा पाटावर धान्य ठेवून त्यावर स्थापन करतात. कलशात तो अर्धा भरेल इतके पाणी घालतात. त्यात थोडे दूध, पैसा व सुपारी टाकतात. कलशावर श्रीफळ ठेवतात व त्याच्या कडेने आंब्याची वा विड्याची पाच पाने लावतात. व त्यावर हळद कुंकू लावतात. स्वस्तिकाचे चिन्हही शुभ असल्याने त्यावर काढले जाते.

### ४३) देवासमोरील रांगोळीत स्वस्तिक का काढतात ?

कारण स्वस्तिक हे शांती, समृद्धी, सौंदर्य आणि मांगल्य यांचे प्रतीक आहे. नवजात बालकाला देखील षष्टीच्या दिवशी स्वस्तिक काढलेल्या वस्त्रावर झोपविले जाते. विवाह करणारे वधुवरही विवाहाच्या मंगलक्षणी स्वस्तिक चिन्हावर आपली दृष्टी स्थिर करतात.

स्वस्तिक हे सर्व मंगल भावनांचे प्रतीक आहे. 'स्वस्तिक: सर्वतो भद्रा'

असे एक वचन आहे. म्हणजे स्वस्तिक सर्वबाजूने सर्वांचे कल्याण करो. केवळ भारतातच नव्हे तर इतरही अनेक देशात स्वस्तिक चिन्हाला मानाचे स्थान आहे. जैन व बौद्धधर्मांनीही स्वस्तिक चिन्हाला पूज्य मानले आहे. यासाठीच देवापुढे स्वस्तिकाची रांगोळी काढली जाते.

### ४४) आरती कशी म्हणावी ?

देवपूजेचा शेवट देवाच्या आरतीने होतो. आरत्यांची सुरुवात 'सुखकर्ता दुखहर्ता' या श्रीगणेशाच्या आरतीने केली जाते. आरतीच्या वेळी शुद्ध तुपाचे निरांजन देवाभोवती ओवाळावे. फक्त ते पूर्वी सांगितल्याप्रमाणे देवाच्या मस्तकावरून नेऊ नये.

आरती करताना ती उगाच भसाड्या आवाजात न म्हणता गोड आवाजात म्हणावी. तसेच चुकीचे उच्चार टाळावेत. उदाहरणार्थ, नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ही ओळ म्हणताना नुर्वी पूर्वी असा उच्चार केला जातो. चारी श्रमले परंतु न बोलवे काही याऐवजी चारी श्रमलो परंतु न बोललो असे चुकीचे शब्द उच्चारले जातात. आरती नेहमी लयीत म्हणावी. त्यावेळी घरातील सर्वांनी तीत भाग घ्यावा व हळू आवाजात झांजा वाजवाव्यात.

आरत्या म्हणण्याचा क्रम पुढीलप्रमाणे आहे –

१) श्रीगणेश, २) श्रीशंकर, ३) श्रीदेवी, ४) श्रीदत्त, ५) श्री पांडुरंग, ६) कर्पुरारती, ७) घालीन लोटांगण आणि शेवटी मंत्र पुष्पांजली. पुढे याचक्रमाने आरत्या दिल्या आहेत.

◆◆◆





# परिशिष्ट

## १) प्राणप्रतिष्ठा

देवमूर्तीत देवत्व निर्माण व्हावे यासाठी ऋषिमुनींनी देवमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यास सांगितले आहे. गणेशचतुर्थीच्या दिवशी गणपतीची पूजा करताना, नवरात्रात देवीची पूजा करताना, अन्यही काही वेळी पूजाविधीत मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करायची असते. या प्राणप्रतिष्ठेचा मंत्र असा –

(हा मंत्र म्हणताना देवमूर्तीच्या पायाला दूर्वा किंवा फूल लावून धरावे.)

**अस्य श्रीप्राणप्रतिष्ठामंत्रस्य ब्रह्मविष्णुमहेश्वरा ऋषय: ।**

**ऋग्यजु: सामाथर्वाणि छंदांसि। परा प्राणशक्तिर्देवता। आं बीजम्। ऱ्हीं शक्ति:। क्रों कीलकम्। अस्यां मूर्तौ प्राणप्रतिष्ठापन विनियोग: ॐ आं ऱ्हीं क्रों अं यं रं लं वं शं ष हं क्षं अ: क्रों ऱ्हीं आं अस्या: मूर्ते : सर्वेन्द्रियाणि वाङ्मनस्त्वक्चक्षु: श्रोत्रजिव्हाघ्राण–वाक्पाणिपाद पायूस्थानि स्वस्थाने इहैवागत्य सुखं चिरं तिष्ठंतु स्वाहा। ॐ असुनीये पुनरस्मासु चक्षु: पुन: प्राणमिह नो धेहि भोगम्। ज्योक्पश्येम सूर्यं मुच्चरंत मनुमते मूळयो न: स्वस्ति ।। गर्भाधानादि पंचदश संस्कार सिद्ध्यर्थं पंचदश प्रणवावृत्ती: करिष्ये।**

असे म्हणून १५ वेळा ॐ काराचा उच्चार करावा. मग पुढील श्लोक म्हणावा.

**रक्तांभोधिस्थपोतोल्लसद्रुणसरोजादिरुढाकराब्जैः ।**
**पाशं कोदंडमिक्षूद्भ वमथगुणमप्यंकुशं पंच बाणान् ।**
**बिभ्राणासृक्कपालं त्रिनयनलसिता पीनवक्षोरुहाढ्या**
**देवी बालार्कवर्णा भवतु सुखकरी प्राणशक्तिः परा नः ॥**

मग देवमूर्तीच्या दोन्ही डोळ्यांना फुलाने तूप लावून नेत्रोन्मीलन करावे आणि लगेच गूळ-खोबऱ्याचा किंवा दुधाचा नैवेद्य दाखवावा.

## त्रोटक यज्ञोपवीत संस्कार विधी :

मौजीबंधन झालेल्या प्रत्येकाने गळ्यात यज्ञोपवीत धारण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय पूजा किंवा भोजन देखील करता येत नाही असे शास्त्रकार सांगतात. यज्ञोपवीत सोयर सुतकानंतर अवश्य बदलावे. ग्रहणानंतरही बदलावे. ते तुटले तरी बदलणे आवश्यक असते. मात्र ते धारण करण्यापूर्वी त्याच्यावर मंत्रांचे संस्कार करावे लागतात.

गळ्यात यज्ञोपवीत असणे हे द्विजत्वाचे एक मुख्य लक्षण आहे. द्विजाने यज्ञोपवीताशिवाय एक क्षणभरही राहू नये. ते नसेल तर भोजनही करू नये. यासाठी अगदी सोपा देवलकथित विधी येथे दिला आहे.

**संकल्प :** आचमन व प्राणायाम व देशकालोच्चार करून

**श्रौतस्मार्त कर्मानुष्ठानसिध्यर्थं नवयज्ञोपवीत**
**अभिमंत्रणंधारणं च करिष्ये ॥**
**(यज्ञोपवीतं पर्णे निधाय)**

असे म्हणून उदक सोडावे.

**यज्ञोपवीत मार्जनाचे तीन मंत्र :**

**ॐ आपो मयोभुवस्थान ऊर्जे दधातनमहेरणाय च क्षसे ॥१ ॥**
**यो वः शिवतमोरसस्तस्य भाजयतेहनः ।**
**उशीतीरिव मातरः ॥२ ॥**

**तस्मा अरंगमामवो यस्यक्षयाय जिन्वथ।**
**आपो जनयथाचनः ॥३॥**

या तीन मंत्रांनी यज्ञोपवीतावर मार्जन करावे.

## यज्ञोपवीत धारण मंत्र :

'एवं गुणविशेषेण विशिष्टायां शुभ पुण्यतिथौ श्रौतस्मार्त-कर्मानुष्ठानसिद्धयर्थं नूतन यज्ञोपवीतधारणमहं करिष्ये' असा संकल्प म्हणून 'यज्ञोपवीतमितिः मंत्रस्य परमेष्ठ ऋषिः। यज्ञोपवीत देवता। त्रिष्टुप छंदः। यज्ञोपवीतधारणे विनियोगः'


असे म्हणावे व नंतर प्रत्येक यज्ञोपवीत घालताना पुढील मंत्र म्हणावा.

**ॐ यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्। आयुष्यमग्र्यं प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः। (इति मंत्रेण प्रथमं दणिबाहुमुद्धुत्य पश्चात् कण्ठे धारयेत ॥) आचम्य समुद्रं गच्छ स्वाहा। (इति जीर्णयज्ञोपवीतं जले विसर्जयेत् ॥)**

असे म्हणत प्रत्येक यज्ञोपवीत डाव्या खांद्यावरून उजव्या काखेखाली असे गळ्यात घालावे. प्रत्येक यज्ञोपवितागणिक एकेक आचमन करावे. मन जीर्ण जानवी कमरेखालून पाय न लावता '**समुद्रं गच्छ स्वाहा**' असे म्हणून जलाशयात सोडावी. **॥इति यज्ञोपवीत संस्कार विधीः ॥**

प्रत्येक जानव्याला तीन दोरे असून प्रत्येक दोरा ठराविक मापाचा बनलेला असतो. जानव्यावर, तीन वेद, तीन देव, तीन अग्नि, तीन ऋणे, तीन लोक इत्यादी राहतात. गाठीवर तीन मात्रा व नाद यांसह ॐ कार आणि गाठीतून बाहेर आलेल्या टोकावर गायत्री देवी वास करते.

◆◆◆



# आरती



## ।। श्री गणपतीची आरती ।।

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची। सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची। कंठीं झळके माळ मुक्ताफळांची। जय देव जय देव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रें मन:कामना पुरती ।। ध्रु० ।। रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा। चंदनाची उटी कुंकुमकेशरा। हिरेजडित मुगुट शोभतो बरा। रुणझुणती नुपुरें चरणी घागरिया ।। जय० ।। २।। लंबोदर पीतांबर फणिवरबंधना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना। दास रामाचा वाट पाहे सदना। संकटी पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना। जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।। दर्शनमात्रें मन:कामना पुरती ।।३।।



## ।। श्री शंकराची आरती ।।

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा। वीषें कंठी काळा त्रिनेत्रीं ज्वाळा। लावण्यसुंदर मस्तकीं बाळा। तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझुळां ।। १।। जय देव

जय देव जय श्रीशंकरा। आरती ओंवाळूं तुज कर्पुरगौरा॥ध्रु०॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा। अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा। विभुतीचें उधळण शितिकंठ नीळा। ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा। जय देव.॥२॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पै केलें। त्यामाजीं अवचित हळाहळ जें उठिलें। तें त्वां असुरपणें प्राशन केलें। नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें॥ जय देव.॥३॥ व्याघ्रांबर-फणिवरधर सुंदर मदनारी। पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी। शतकोटीचें बीज वाचे उच्चारी। रघुकुळटिळक रामदास-अंतरी॥ जय देव.॥४॥



## ॥ श्रीदेवीची आरती ॥

दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारीं। अनाथनाथे अंबे करुणा विस्तारीं। वारीं वारीं जन्ममरणातें वारीं। हारीं पडलों आतां संकट निवारीं॥१॥ जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी। सुरवर-ईश्वरवरदे तारक संजीवनी ॥ जय०॥ ॥ध्रु०॥ त्रिभुवनभुवनीं पाहतां तुजऐशी नाहीं। चारी श्रमले परंतु न बोलवे कांहीं। साही विवाद करितां पडले प्रवाही। ते तूं भक्तालागी पावसि लवलाही॥ जय०॥२॥ प्रसन्नवदनें प्रसन्न होसी निजदासां। क्लेशांपासुनि सोडीं तोडीं भवपाशां। अंबे तुजवांचून कोण पुरविल आशा। नरहरी तल्लिन झाला पदपंकज लेशा॥ जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी। सुरवर-ईश्वरवरदे तारक संजीवनी॥३॥



## ॥ श्रीदत्ताची आरती ॥

त्रिगुणात्मक त्रयमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणीं अवतार त्रैलोक्यराणा। नेति नेति शब्दें न ये अनुमाना। सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना ॥ १॥ जय देव जय देव जय श्रीगुरुदत्ता। आरती ओंवाळितां हरली भवचिंता ॥ ध्रु० ॥ सबाह्य अभ्यंतरीं तूं एक दत्त। अभाग्यासी कैंची न कळे ही मात। पराही परतली तेथे कैंचा हेत। जन्म-मरणाचाही पुरलासे अंत ॥ जय देव. ॥ २॥ दत्त येऊनियां उभा ठाकला। सद्भावे साष्टांगें प्रणिपात केला। प्रसन्न होऊनी आशीर्वाद दिधला। जन्म-मरणाचा फेरा चुकविला ॥ जय देव. ॥ ३॥ दत्त दत्त ऐसें लागलें ध्यान। हारपले मन झालें उन्मन। मी तूंपणाची झाली बोळवण। एकाजनार्दनीं श्रीदत्तध्यान ॥ जय देव. ॥ ४॥



## ॥ श्री विठोबाची आरती ॥

युगें अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगीं रखुमाई दिसे दिव्य शोभा। पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आलें गा। चरणीं वाहे भीमा उद्धरीं जगा ॥ १॥ जय देव जय देव जय पांडुरंगा॥ रखुमाईवल्लभा राईच्या वल्लभा पावें जिवलगा ॥ जय० ॥ ध्रु० ॥ तुळसीमाळा गळां कर ठेवूनि कटीं। कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं। देव सुरवर नित्य येती भेटीं। गरुड हनुमंत पुढें उभे राहती ॥ जय० ॥ २॥ धन्य वेणूनाद अनुक्षेत्रपाळा । सुवर्णाची कमळें वनमाळा गळां। राई रखुमाबाई राणीया सकळा। ओंवाळीती राजा विठोबा सांवळा। जय० ॥ ३ ॥ ओंवाळूं आरत्या

कुरवंड्या येती। चंद्रभागेमाजी सोडुनियां देती। दिंड्या पताका वैष्णव नाचती। पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय० ।। ४ ।। आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागेमध्ये स्नानें जे करिती। दर्शनहेळामात्रें तयां होय मुक्ती। केशवासी नामदेव भावे ओवाळीती ।। जय देव जय देव जय० ।।५।।



## ।।कर्पुरारती ।।

कपूर्रगौरा। करुणावतारा। संसारसारा। भुजगेंद्रहारा। सदा रहासी हृदयारविंदीं। भव भवानीसह तूज वंदी ।। १ ।।

आरती संपल्यावर लगेच पुढील श्लोक म्हणावे.

घालीन लोटांगण, वंदीन चरण। डोळ्यांनी पाहीन रूप तुझें। प्रेमें आलिंगीन आनंदें पूजोन। भावें ओंवाळीन म्हणे नामा ।। १ ।। त्वमेव माता च पिता त्वमेव। त्वमेव बंधुश्च सखा त्वमेव। त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव। त्वमेव सर्वं मम देवदेव ।। २ ।। कायेन वाचा मनसेंद्रियैर्वा, बुद्ध्यात्मना वानुतृततिस्वभावात्। करोमि यद्यत्सकलं परस्मै, नारायणायेति समर्पयामि ।। ३ ।। अच्युतं केशवं रामनारायणं, कृष्णदामोदरं वासुदेवं हरिम्। श्रीधरं माधवं गोपिकावल्लभं, जानकीनायकं रामचंद्रं भजे ।। ४ ।। हरे राम हरे राम, राम राम हरे हरे। हरे कृष्ण हरे कृष्ण, कृष्ण कृष्ण हरे हरे ।। ५ ।।



## ।। मंत्रपुष्पांजली ।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्तदेवास्तानिधर्माणि प्रथमान्यासन्। तेहनाकं महिमान: सचन्त यत्र पूर्वेसाध्या: सन्ति देव: ।। ॐ राजधिराजाय प्रसह्यसाहिने। नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। स मे कामान् कामकामाय मह्यं कामेश्वरो वैश्रवणोददातु। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नम:। ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं, पारमेष्ठ्यं राज्यं माहाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्याईस्यात् सार्वभौम: सार्वायुष आंतादापरार्धात् पृथिण्यै समुद्रपर्यंताया एकराळिति। तद्प्येष श्लोकोऽभिगीतो मरूत: परिवेष्टारो मरूत्तस्यावसन् गृहे। आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति।

देवपूजा झाल्यानंतर सदगुरू वसनाचा पुढील श्लोक म्हणतात–

**ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे।**
**त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे।**
**मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी।**
**तेथे तुझे सद्गुरू पाय दोन्ही ।।**

◆◆◆

# उपसंहार



देवपूजा हे प्रत्येकाचे अत्यावश्यक असे नित्यकर्म आहे. हे काम एखाद्या ब्राह्मणावर सोपवून भागणार नाही. ही पूजा घरातील कर्त्या व्यक्तीने स्वत:च केली पाहिजे. घरातील लहान मुलांनाही देवपूजेचे धडे मोठ्यांनी दिले पाहिजेत तरच ही परंपरा पुढे चालू राहील व त्यांच्यावरही योग्य ते सुसंस्कार होतील.

देवपूजा ही नेहमी कर्तव्यबुद्धीने केली पाहिजे. त्यामुळे ती कशीतरी उरकून चालणार नाही. 'पाट्या टाकणे' हा प्रकार इथे उपयोगाचा नाही. ही पूजा भोळ्या भक्तिभावाने व निस्सीम प्रेमानेच व्हायला हवी. तिच्यात डामडौलापेक्षा देवावरील अपार प्रेम व श्रद्धा या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. आत्मिक व अध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी ही देवपूजा करावयाची आहे. इतर सांसारिक विचार व चिंता विसरून त्या महान शक्तीशी थोडा वेळ का

होईना मनाने एकरूप होण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. यासाठीच देवपूजेच्या वेळी थाटमाटाला महत्त्व नाही. उंची व महागड्या वस्तूंचा वापर केला म्हणजे देव प्रसन्न होतो असे नाही. तो केवळ भावाचा भुकेला आहे. त्याला तुमचे निर्मळ प्रेम पाहिजे, भक्ति पाहिजे. अशा निर्मळ मनाने, चित्त एकाग्र करून केलेली देवपूजा निश्चितच फलदायी झाल्याशिवाय राहणार नाही.


ती शास्त्रशुद्ध केली तर तिचे फल केव्हाही अधिकच मिळेल. यात मुळीच शंका नाही.

पुष्कळ लोक वेळ कमी या सबबीखाली पाच दहा मिनिटात कशीतरी देवपूजा उरकताना दिसतात. या लोकांची 'वेळ कमी' ही सबब खरेतर साफ चुकीची आहे. कारण त्यांना तासन्‌तास दूरदर्शन पहायला किंवा चकाट्या पिटायला वेळ असतो. वेळ नसतो फक्त देवपूजेसाठी! दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे सकाळी मोठ्या थाटात सोवळे नेसून देवपूजा करायची आणि नंतर दिवसभर लोकांचे गळे कापायचे आणि देव भेटत नाही अशी तक्रार करायची यालाही काही अर्थ नाही. देवाचा पूजक हा मनाने निर्मळच असायला हवा. त्याला पापाची भीती वाटायला हवी. तरच भगवंताची कृपा त्याच्यावर होईल आणि तो या संसार चक्रातून बाहेर पडून मुक्तीचा आनंद लुटेल.

देवपूजा करण्यामागे एवढा व्यापक विचार आहे. एखादा उपचार चुकला किंवा राहिला तर चालेल फक्त तुम्ही तो किती निष्ठेने नि भोळ्याभावाने श्रद्धेने व शुद्धमनाने केला याला देवाच्या लेखी महत्त्व आहे. वाचकांनी या मार्गाने आपली आध्यात्मिक प्रगती साधावी एवढीच इच्छा नि त्यासाठीच हे ग्रंथलेखन.

इति लेखन सीमा.

◆◆◆



ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे ।
त्या त्या स्थळी हे निजरूप तुझे ।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी ।
तेथे तुझे सद्‌गुरू पाय दोन्ही ॥

# *श्री. वि. के. फडके*

## यांची आम्ही प्रकाशित केलेली लोकप्रिय पुस्तके

- गायत्री मंत्र आणि उपासना
- श्री महालक्ष्मी महात्म्य
- जीवन सुखी करणारी स्तोत्र, रत्ने आणि यंत्रे
- सर्व इच्छापूर्तीसाठी संकटनिवारक सुंदरकांड
- बाधा निवारणासाठी नवनाथ ५ वा अध्याय
- दत्तकृपेसाठी गुरुपासष्टी व चमत्कारी दत्तस्तोत्र
- फलज्योतिषातील ५०० गृहयोग
- आध्यात्मिक शंका समाधान
- सुख आणि संपत्ती देणारे प्रभावी स्तोत्र श्रीरामरक्षा
- देवपूजा अशी करा
- दत्तावतार अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ
- शिर्डीचे श्रीसाईबाबा
- शेगावचे श्री गजानन महाराज
- इच्छा पूर्ण करणारा नवनाथ ४० वा अध्याय

## *श्री. ह. भ. प. कृष्णकांत नाईक लिखित*

- ❖ आपले पारंपरिक सण व उत्सव
- ❖ इच्छापूर्ण करणारी देवस्थाने
- ❖ बारा ज्योतिर्लिंग माहात्म्य
- ❖ संत महिमा

## *लेखक : पंडित भरतकुमार किसनलाल शर्मा*

- ❖ सुख समृद्धी प्रदायक यंत्र, मंत्र, तंत्र व तोडगे

## *संकलन : हेमलता पंडित*

- ❖ मुला-मुलींची ५१११ नावे: बारसे बाळाचे
- ❖ पाळणे संग्रह
- ❖ ओळखा पाहु (कोडीच कोडी)

## *डॉ. ज्ञानेश्वर तांदळे लिखित*

- ❖ श्री. गणेश पूजा व उपासना

## *प्रा. सौ. शीला काकडे*


- ❖ ५०१ सुविचार


---



**अक्षय्य प्रकाशन**


१९०, शुक्रवार पेठ,
दुध्या मारुती मंदीराजवळ, पुणे २.
मो. : ९४२२५१०१७५, ९७६७१७६६५५

# अक्षय्य प्रकाशन लोकप्रिय प्रकाशने

























**अक्षय्य प्रकाशन**
१९०, शुक्रवार पेठ, पुणे – ४११ ००२.
मोबाईल : ९४२२५१०१७५